web: http://navakal.org,
e-mail- info@navakal.org

वर्ष-९० | अंक-२३ | मुंबई | शुक्रवार ३० मार्च २०१२ | संपादक : सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | पाने-८ | किंमत:₹ २

REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवा काळ

एक चळवळ

## अजित पवारांची घोषणा! गॅस दरवाढ २ टक्क्यांनी कमी

मुंबई, गुरुवार - राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी अपेक्षेप्रमाणे घरगुती गॅसवर वाढविलेला कर २ टक्क्यांनी मागे घेतला आहे. हा कर आता ५ टक्क्यांऐवजी ३ टक्के एवढा आकारला जाणार आहे. राज्यभरात घरगुती गॅस दरवाढीवरून प्रचंड संताप व्यक्त केला जात होता. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनीही या घरगुती गॅस दरवाढीला विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर ही गॅस दरवाढ २ टक्क्यांनी मागे घेत असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. विधान परिषदेमध्ये आज अजित पवार यांनी ही घोषणा केली.

**पालकांनो तुमच्या मुलांना या सुट्टीत चिपलेव्हल कॉम्प्युटर - लॅपटॉप रिपेअरिंग इंजिनिअर बनवा...**

१०वी, १२ वी, पदवी, इंजिनिअरींग सर्व प्रकारच्या परिक्षा सुरु आहेत. तर काही संपल्या आहेत. पण सुट्टीत मुले / मुली काय करणार हि सर्व पालकांना चिंता असते. म्हणून ते कुठल्यातरी क्लासला टाकतात पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. फक्त भरमसाट पैसे खर्च करुन त्यांच्या हातात भेटते ते फक्त सर्टिफिकेट. पण आपण थोडा वेगळा विचार केला तर, मुला/मुलींचे दोन महिने खराब होणार नाहीत कारण महाराष्ट्रात प्रथमच चिपलेव्हल कॉम्प्युटर रिपेअरींग, नेटवर्कींग व सोल्डरिंग बेस लॅपटॉप रिपेअरिंग कोर्स आमच्याकडे राबविला जातो. हा कोर्स २ महिने दररोज २ तास किंवा १५ रविवारचा आहे. हा कोर्स केल्यानंतर मुलं/मुली कॉलेज करुन फावल्यावेळात सकाळी व संध्याकाळी दोन तास काम करुन महिन्याला १० ते २० हजार रुपये कमवू शकतात. व आपल्या शिक्षणाचा खर्च देवून ते तुम्हाला सुध्दा पैसे देवू शकतात. सदर प्रशिक्षण हे संपुर्णपणे प्रॅक्टीकली असून वय व शिक्षणाची अट नाही. सदर प्रशिक्षण हे सरकारमान्य असून यात ओपन (२०) एससी (१०) एसटी (७), मुस्लीम (३), ख्रिश्चन (२), व्हिजेएनटी (३), ओबीसी (७), अपंग (२) अशा राखीव जागा आहेत. तरी आपल्या मुलां/मुलींना इंजिनिअर बनवायचे असेल तर हिच सुवर्णसंधी आहे. हि काही खोटी / फसवी जाहिरात नाही तुम्ही अनेक ठिकाणी जा त्यांना विचारा तुम्ही मदर बोर्ड, लॅपटॉप, आयसी रिप्लेसमेंट, चिप लेव्हलवर शिकवणार का ? जर तेथे शिकवित असतील तर तेथेच प्रवेश घ्या आमच्याकडे प्रवेश घेऊ नका. आमच्याकडे प्रवेश घेऊ नका हे सांगणारी आमची एकमेव संस्था आहे. संपर्क : ९३२४९५१६५२ / ९३२३४१७८०० / ९३२१७४४०१९ / २० मुलींसाठी मोफत कोर्स - ९३२३१५७७१३

## राज ठाकरे शिवसेनेवर संतप्त! मला गृहीत धरलेले आवडत नाही

# ठाण्यात मनसेचा आघाडीला पाठिंबा

## ‘कृष्णकुंज’वर जितेंद्र आव्हाड! ४० मिनिटे चर्चा!



**मुंबई, गुरुवार - राज ठाकरे यांच्या ‘कृष्णकुंज’वर आज दुपारी ४० मिनिटांचे राजकीय नाट्य घडले. ठाण्यातील राष्ट्रवादीचे नेते, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ‘कृष्णकुंज’वर स्वत: जाऊन राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर राज ठाकरे यांनी थेट शिवसेनेवर संतप्त होत ठाण्यात स्थायी समितीसाठी काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीला पाठिंबा जाहीर केला. यावेळी राज ठाकरे म्हणाले की, ‘मला गृहीत धरलेले आवडत नाही. ठाण्यात उत्तर प्रदेशातून आलेला बसपा हा पक्ष वाढविण्याचा तुम्ही प्रयत्न कराल तर तो मला मान्य नाही, म्हणूनच मी आघाडीला पाठिंबा देत आहे.’**

राज ठाकरे हे पुढे म्हणाले की, ‘ठाण्यातल्या स्थायी समितीची निवडणूक जवळ आली आहे. पण आपणाला काहीच कसे कळविलेले नाही. म्हणून मी काल शिवसेनेच्या आमदार एकनाथ शिंदेना फोन लावला.’ त्यांना म्हटले स्थायी समितीच्या निवडणुकीचं काय ठरवलंय? त्यावर ते म्हणाले की, ‘आमची बसपाशी कमिटमेंट झाली आहे. आम्ही बसपाच्या उमेदवाराला पाठिंबा देणार आहे. मग मात्र माझं टाळकं तिथच सटकलं. तुम्हाला पाठिंबा दिला तो तुम्हाला निवडणुकीत जनाधार होता म्हणून! पण तुम्ही वेडेवाकडे निर्णय घ्याल तर ते मी खपवून घेणार नाही. मला गृहीत धरण्याचा प्रयत्न कुणी करू नये. मुळात मला गृहित धरलेले आवडत नाही.’

राज ठाकरे पुढे म्हणाले की, प्रश्न असा आहे की, बसपाशी कमिटमेंट करून तुम्ही पाठिंबा देताय. महत्त्वाच्या स्थायी समितीची सूत्रे तुम्ही बसपाला देता! नाशिकमध्ये झालेल्या गोष्टीचा वचपा मी इथे काढलेला नाही. तसा वचपा काढायला मी छोटा नाही. त्यामुळे मी आता जे केलेय ते जाहीर केले आहे. शिवसेना-भाजपाचा कुणीही उमेदवार आम्हाला चालला असता, पण ते ही नाही.

राज ठाकरे शेवटी म्हणाले की, आता हे सर्वजण मागे लागलेत. आम्ही असे करणार नाही. जेव्हा त्यांना हवे असते त्यावेळी ते दहादा फोन करतील, मागे लागतील, आम्ही त्यांना बिनशर्त पाठिंबा दिला होता. परंतु म्हणून आम्हाला गृहीत धरून त्यांनी निर्णय घ्यावा का? मुळात मला गृहीत धरलेले आवडत नाही. त्यामुळे मी आघाडीला पाठिंबा जाहीर केला आहे.

## सांगली जिल्हा बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केले

### ‘राष्ट्रवादी’ला हादरा!

सांगली, ता.२९- साखर कारखान्यांना सुमारे ३५० कोटी रुपयांचे कर्जवाटप करून त्याची वसुली वेळेत न करता, ही कर्जाची रक्कम तोट्यात दाखविण्याची बनवाबनवी करणाऱ्या सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आल्याने जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. दोनच दिवसांपूर्वी या बँकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे गृहमंत्री आर.आर. पाटील यांचे निकटचे सहकारी समजले जाणारे माजी आमदार दिनकर पाटील यांनी हातात घेतल्यानंतर ही बरखास्तीची कारवाई नाबार्डने केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसलाही मोठा हादरा बसला आहे.

गेल्या दहा वर्षांपासून या बँकेवर आपली सत्ता गाजविणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात या बरखास्तीच्या कारवाईने खळबळ उडाली आहे. या जिल्हा बँकेने माणगंगा सहकारी साखर कारखाना (आटपाडी), वसंतदादा सहकारी साखर कारखाना (सांगली) आणि महांकाली सहकारी साखर कारखाना (कवठेमहांकाळ) अशा तीन कारखान्यांना सुमारे ३५० कोटी रुपयांचे कर्जवाटप केले. मात्र सन २००० पासून या कारखान्यांनी आपली कर्जफेड करण्यात अनियमितता दाखविली होती. त्यांच्या खात्यामधील ही अनियमितता पाहून नाबार्डने २०१० साली केलेल्या तपासणीवेळी संचालक मंडळावर ताशेरे ओढले होते. तसेच या बँकेला एपीए-ड (३) मध्ये समाविष्ट केले होते.

विशेष म्हणजे, या कारखान्यांना दिलेल्या कर्जासाठी या कारखान्यांनी तारण म्हणून सुमारे ३५७ कोटींच्या मालमत्तेची तरतूद बँकेला दाखविली होती. असे असताना कर्जवसुलीसाठी तारण जप्त न करता, बँकेने या कारखान्यांच्या कर्जाच्या रकमेला तोटा म्हणून दाखविण्याची बनवाबनवी केली होती. त्यामुळे अखेर आज या बँकेचे संचालक मंडळच बरखास्त केले.

पुढील मजकूर पान ४ वर

## अंधांसाठी घरबसल्या थोडे कार्य करा!

**(सौ. जयश्री खाडिलकर-पांडे)**

आपण रोज सहजगत्या अनेक गोष्टी वाचतो, पाहतो! पण अंधांना हे शक्य होत नाही. अभ्यास करणे हे मोठे संकटच ठरते. कारण अभ्यासक्रमातील धडे अंधांना वाचून कोण दाखविणार? ‘मला थोडे वाचून दाखवा हो’ अशी विनंती करीत करीत अंधाला शिकावे लागते.

‘मला वाचून दाखवा’ ही अंधांची कळकळीची विनंतीही आपण बहुसंख्य वेळा ‘वेळ नाही’ असे म्हणून लगेच धुडकावून लावतो. आपल्याकडे वेळ नाही तर अंध अभ्यास करणार कसा? फावल्या वेळात अंधाला जाऊन भेटणे आणि त्याला वाचून दाखविणे हे आपल्याला शक्य नसते. पण आता अंधांनी यावर मार्ग काढला आहे.

आपल्याला अंधाच्यासमोर बसून वाचून दाखविणे वेळेअभावी शक्य नसेल, पण आता बहुसंख्य अंधांकडे एमपीथ्री प्लेअर असतो. त्यांना जे काही वाचून हवे असेल ते पुस्तक आणि एमपीथ्री प्लेअर आपल्याकडे देतात आपण ते घरी घेऊन जायचे आणि दिवसभरात जेव्हा वेळ असेल तेव्हा मजकूर वाचून एमपीथ्रीमध्ये रेकॉर्ड करायचा. घरी जेव्हा सवड मिळेल तेव्हा हे काम करता येणार आहे. त्यामुळे गृहिणी, विद्यार्थी या कार्यात हातभार लावू शकतात. दिवसातील थोडा वेळ दिला तर अंधांना पर्वताएवढी मदत होईल.

यासाठी ०२२-२३७२६७४७ आणि ०२५१-२४३०४४२ यावर संपर्क साधून तुमच्या नावाची नोंदणी करा. मदत करा.

## हनुमानपाड्यातील पुनर्वसन प्रश्नावर वनमंत्र्यांनी दिले तत्काळ माहिती मागविण्याचे आदेश



मुंबई, गुरुवार - मुलुंड येथील हनुमानपाड्यातील पुनर्वसनच्या प्रश्नाबाबत आज वनमंत्री पतंगराव कदम यांची ‘नवाकाळ’ संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांनी मलबारहिल येथील निवासस्थानी भेट घेतली. यावेळी हनुमानपाड्यातील रहिवाशांच्या वतीने सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांनी वनमंत्र्यांना निवेदन दिले. हनुमानपाड्यातील रहिवाशांचे प्रतिनिधी उदय शिर्सेकर, प्रवीण फणसे, भरत वाईकर आणि ‘नवाकाळ’चे यशवंत मोर्ये हेदेखील वनमंत्र्यांच्या भेटीदरम्यान उपस्थित होते.

वनमंत्री पतंगराव कदम यांनी या प्रश्नासंदर्भात उपनगर जिल्हाधिकारी आणि वन विभागाकडून तत्काळ माहिती मागविण्याचे आदेश दिले आहेत. तसेच या प्रश्नासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यासाठी वनमंत्र्यांनी ३ एप्रिल रोजी एका बैठकीचे आयोजन केले असून त्या बैठकीस ‘नवाकाळ’ संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे आणि हनुमानपाड्यातील रहिवाशांच्या प्रतिनिधींना उपस्थित राहण्यास सांगितले आहे. विशेष म्हणजे मनसेचे आमदार प्रवीण दरेकरदेखील या बैठकीला उपस्थित राहणार असल्याचे वनमंत्र्यांनी सांगितले.

हनुमानपाड्यातील पुनर्वसनाप्रश्नी ‘नवाकाळ’ने पुढाकार घेतल्याबद्दल तेथील रहिवाशांच्या प्रतिनिधींनी ‘नवाकाळ’चे आभार मानले.

## शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची तोफ दणाणली!

# ‘लष्करप्रमुखाने देशाला नागवे केले’! अण्णा हजारे यांच्यावर हल्लाबोल

मुंबई, गुरुवार- शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आज एकच तोफ डागली. बाळासाहेब ठाकरे यांनी जबरदस्त हल्लाबोल केला आहे. भारताचे लष्करप्रमुख व्ही.के.सिंग यांनी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांना एक पत्र पाठविले आहे. जनरल व्ही.के.सिंग यांच्या या ‘लेटर बॉम्ब नंतर’ सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर बाळासाहेब ठाकरे यांनी हा हल्लाबोल केला आहे.

बाळासाहेब ठाकरे यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे की, ‘लष्करप्रमुखांनी आपले म्हणणे पंतप्रधानांना भेटून सांगावयास हवे होते. त्यांनी पंतप्रधानांना पत्र लिहिले आणि हे पत्रही फुटले. लष्करप्रमुखांनी देशाला नागवे केले. हे काय चाललं आहे? कोणाचा कोणाला पायपोस राहिलेला नाही. लष्करप्रमुख हवाई दलातील त्रुटीबद्दल बोलतात. पोलीसप्रमुखही मुलाखती देत असतात. कोणावरही नियंत्रण राहिलेले नाही.’

**अण्णा हजारे यांच्यावरही हल्लाबोल**

बाळासाहेब ठाकरे यांनी यावेळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यावर जबरदस्त हल्लाबोल केला. ‘परदेशी पैशांवर नाचणारा मोर’ अशा शब्दांत हा हल्लाबोल करण्यात आला आहे. संसदेवर वर्चस्व गाजविणारे हे कोण? हे लोक कोणावरही काहीही आरोप करीत असतात. बाळासाहेब ठाकरे यांनी देशाच्या स्थितीबद्दल एकच संताप व्यक्त केला.

## कोकणचा राजा हापूस आंबा महागला

मुंबई, गुरुवार- कडाक्याच्या थंडीच्या लाटेचा फटका कोकणातील हापूस आंब्याला बसला आहे. वाशी येथील फळ बाजारातील आंब्याची आवक घटली आहे. आंब्याची आवक एक लाख पेट्यावरून ३० ते ६० हजार पेट्यांवर घसरली आहे. आंब्याचे दर डझनामागे ६०० रुपयांपर्यंत वाढले आहेत. गेल्या वर्षी डझनभर आंब्याचा दर ४०० ते १२०० रुपयांच्या दरम्यान होता. आता एक डझन आंब्यासाठी ८०० ते १ हजार रुपयांपर्यंत किंमत मोजावी लागत आहे.

**शुभराशी - १,२,४**

## सुवर्ण गणेशाच्या चोरीच्या निषेधार्थ रायगडमध्ये उत्स्फूर्त कडकडीत बंद

रायगड, ता. २९- दिवेआगारच्या सुवर्ण गणेशमूर्तीच्या चोरीच्या निषेधार्थ शिवसेनेने पुकारलेल्या रायगड जिल्हा बंदला तेथील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन कडकडीत बंद पाळला. येथील सर्व दुकाने व्यापाऱ्यांनी बंद ठेवली होती. रिक्षा संघटनाही बंदमध्ये सहभागी झाल्या होत्या.

सुवर्ण गणेश मंदिरातून चोरट्यांनी दीड किलो वजनाची सोन्याची मूर्ती आणि ऐवज पळविला. दरोडेखोरांच्या हल्ल्यात एका सुरक्षारक्षकाचाही मृत्यू झाला. मात्र पोलिसांना दरोडेखोरांना पकडण्यात अद्याप यश आलेले नाही. त्याचाच निषेध म्हणून शिवसेनेने बंदची हाक दिली. आजच्या बंदमध्ये शाळांना वगळण्यात आले होते. काही शाळांमध्ये परीक्षा सुरू झाल्याने बंदमधून शाळांना वगळण्यात आले होते. शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिरातून घंटानाद आंदोलनाला सुरुवात केली.

## एका वाक्यात

### २२ लाखांची नळपाणी योजना पाण्यात
दोडामार्ग तालुक्यातील पणतुर्ली गावातील सुमारे २२ लाख रुपये खर्च करून राबविण्यात आलेली सार्वजनिक नळपाणी योजना दूषित पाण्यामुळे पाण्यात गेली आहे.

### चिपळूणच्या चोरद नदीत माशांचा खच
चिपळूण तालुक्यातील चोरद नदीत कुणा अज्ञाताने विषारी केमिकल टाकल्याने नदीत माशांचा खच दिसत आहे.

### अर्धवट जळालेला मृतदेह आढळला
सुधागड तालुक्यातील झाप गावच्या हद्दीतील ओसाड शेतीच्या बांधाजवळ गवतात अर्धवट जळालेल्या अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

### सावंतवाडी 'तहसील' राजवाड्यात स्थलांतरीत
सावंतवाडी तहसीलदार कार्यालयाच्या ठिकाणी प्रशासकीय भवन बांधले जाणार असल्याने हे तहसील कार्यालय सावंतवाडी राजवाड्यात हलविले जाणार आहे.

### लांजा तालुक्यात १७पासून भजन स्पर्धा
लांजा तालुक्यातील वाडगाव येथील श्री विठ्ठल-रखुमाई समितीच्या वतीने मंगळवार १७ एप्रिल ते शुक्रवार २४ एप्रिल या कालावधीत तालुकास्तरीय भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

### मुरूडच्या समुद्रकिनारी ५ मृत कासवे
मुरूडच्या समुद्रकिनाऱ्यावर एकाच वेळी पाच कासवे मृतावस्थेत आढळून आल्याने नागरिकांत हळहळ व्यक्त होत आहे.

### जैतापूर परिसरात पाणीटंचाई
जैतापूर परिसरात मार्च महिन्यातच तीव्र पाणीटंचाई भासत असून एसटी स्टॅण्डजवळील तलावाची पातळीही घटत चालली आहे.

### वायरीत रस्त्यासाठी ग्रामस्थ आक्रमक
मालवण तालुक्यातील वायरी भूतनाथ गावातील ग्रामस्थ वायरी-बोडवेवाडी रस्त्याबाबत आक्रमक झाले असून या ग्रामस्थांनी उपअभियंता आणि ठेकेदाराला धारेवर धरले.

### बीड जिल्ह्यात दलितांवर बहिष्कार
बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील सिंदफणा-चिचोली गावातील सवर्णांनी गेल्या १२ दिवसांपासून दलितांवर सामुहिक बहिष्कार टाकला आहे.

### जळगावच्या जैन मंदिरातून ८ मूर्ती लंपास
जळगाव जिल्ह्यातील नेरी येथील बाजारपेठेनजीकच्या दिगंबर जैन मंदिरातील पंचधातूच्या प्राचीन आठ मूर्ती चोरट्यांनी लंपास केल्याने खळबळ उडाली आहे.



आधुनिक स्त्री विकास प्रतिष्ठानच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त गरूड झेप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिलांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविण्यात आली. अध्यक्षस्थानी विद्या सरमळकर, सूत्रसंचालन सुवर्णा चिकने यांनी केले.

# पोलिसांना २५ हजारांची लाच दिली नाही! अल्पवयीन मुलावर केला खोटा गुन्हा दाखल

पुणे, ता. २९ - पोलिसांनी अल्पवयीन मुलास दुचाकी चोरीच्या खोट्या गुन्ह्यात अडकविल्याने शहरात संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. पोलिसांच्या हुकूमशाहीच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांनी बेमुदत उपोषण सुरु केले आहे.

२५ हजाराची लाच दिली नसल्याने पोलिसांनी मुलाचे वय १६ असताना १९ लावून खोटा गुन्हा दाखल केला. असा सनसनाटी आरोप उपोषणकर्ते नेते भागवत कांबळे, महेश शिंदे, हिरुभाऊ शिंदे, अरुण गायकवाड, गणेश भोसले, रमेश साळवे, अमीत कदम, शैलेश सोनवणे, शालन कांबळे, संगीता गायकवाड यांनी केला आहे. याबाबत पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अरुण व उज्ज्वला गायकवाड यांचा मुलगा सूरज याला कोथरूड पोलिसांनी दुसऱ्याच्या सांगण्यावर दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात पकडले.

वास्तविक पाहाता पोलीस घरी आले असता सूरज हा आजारी असल्याने त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्याचे पोलिसांना सांगितले. हावलदार गायकवाड व त्यांच्या सहाकारी पोलिसांनी सांगितल्यानुसार गायकवाड यांनी सूरजला पोलीस ठाण्यात नेले. तेथे गेल्यावर पोलिसांनी त्याला बेदम मारहाण केली. आजारी असतानाही पोलिसांनी मारहाण केल्याचा आरोप निवेदनात केला आहे. वारजे पोलीस ठाण्यात दुचाकी चोरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला मात्र कोथरूड पोलिसांनी सुरजला मारहाण केली.

त्याला सोडून देण्यासाठी पोलिसांनी गायकवाड व त्यांच्या मेहुण्याकडे २५ हजार रुपयांची लाच मागितली. ही रक्कम का द्यावी? आमच्या मुलाने गुन्हा केलाच नाही असे सांगितल्याने पोलिसांनी सूडबुध्दीने वय कमी असतानाही १९ वर्ष लावून सूरजवर खोटा गुन्हा दाखल केला असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या संदर्भात रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक अध्यक्ष रामभाऊ डंबाळे यांनी दोषी पोलिसांविरुध्द कारवाई करावी व दाखल केलेला खोटा गुन्हा त्वरीत मागे घेण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

### गुरव ज्ञाती समाजाचा १ एप्रिल रोजी वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा

मुंबई, गुरुवार - गुरव ज्ञाति समाज, मुंबई या संस्थेचा २३वा वर्धापनदिन आणि वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा रामनवमी, रविवार १ एप्रिल २०१२ रोजी, सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत गुरव ज्ञाति भवन, २सी/३ सेक्टर ९ए, बस स्थानकाशेजारी, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

तरी सर्व समाज बांधवांनी या संमेलन सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे प्रमुख कार्यवाह अनंत गुरव यांनी केले आहे.

# शेजाऱ्यानेच दिले प्रसादातून विष! युवकास अटक

कराड, ता. २९ - येथील रविवार पेठेतील विजय रवींद्र तारळेकर याचा प्रसादातून विष पाजून खून केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. त्याच्या घरासमोरीलच हेमंत रघुनाथ रेडेकर (२५) या युवकास पोलिसांनी बुध.(२८)रात्री अटक केली. पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन विजयचा बदला घेण्याच्या उद्देशानेच प्रसादाचा आधार घेऊन त्याचा खून करण्याचा कट तीन दिवसांच्या परिश्रमानंतर व जटिल बनत चाललेला तपास पोलीसांनी शिताफीने उघडकीस आणला. दरम्यान,हेंमत रेडेकर व मारुती मस्कर यांचे भाजी मंडईतील मटण मार्केटच्या बाहेर मिरच्या व मसाला विक्रीचे दुकान आहे.या दुकानांच्या व्यावसायिक वादातून विजय तारळेकर याचा खून करण्यात आला.

२५ डिसेंबर २०११ रोजी हेमंत रेडेकर व मारूती मस्कर यांच्यात ग्राहक बोलवण्यावरुन वाद झाला होता व ती माहिती मस्करचे मित्र विजय तारळेकर यांना समजली.तारळेकर मस्कर यांच्या दुकानात बसत होता.त्यामुळे त्याने मस्करची बाजू घेऊन हेमंत रेडेकरला बेदम मारहाण केली.

त्या वेळी हेमंतचा भाऊ निलेश याला विजयच्या मित्रांनी अडविले.होते.त्यासंदर्भाने २५ डिसेंबरला भाजी मंडईतील पोलीस चौकीत हेमंत रेडेकर याने विजय व अन्य लोकांविरोधात तक्रार दिली होती. विजयकडून बेदम मारहाण झाल्यानंतर हेमंत याच्या डोक्यात त्याच्याबद्दल राग होता. त्याचा काटा काढण्यासंदर्भात तो अनेक ठिकाणी बोललाही होता. मात्र,कट काय असावा, याचा त्याने दोन महिने विचार केला.त्यानुसार त्याने तारळेकर यांच्या घरी पोस्टकार्डवरन एक पत्र लिहिले.त्या पत्रामध्ये तारळेकर कुटुंबांची वाताहत का होत आहे, याबाबतचा मजकूर लिहिला.यातून बाहेर पडायचे असेल, तर मला कॉल करा, असे म्हणून अरविंद कुलकर्णी असे नाव लिहून पुढे मोबाईल क्रमांक टाकला.पत्रामध्ये विजय याला साडेसाती असल्याचा विशेष उल्लेख करण्यात आला होता.

### बेस्ट व्यवस्थापनाकडून विद्यार्थ्यांची ससेहोलपट

मुंबई, गुरुवार - लालबाग- चिंचपोकळी येथून शिरोडकर, आर.एम.भट्ट राजा शिवाजी विद्यालय, दादर येथील विद्यार्थ्यांसाठी सकाळी ६.२५ वाजता सुटणारी ६१ क्रमांकाची बस गेल्या अनेक महिन्यांपासून बंद करण्यात आली असून शाळेतील मुलांचे अतोनात हाल होऊ लागले आहेत. याबाबत बेस्ट अति. महाव्यवस्थापक वाहतूक यांना १५ डिसेंबर २०११ पासून विद्यार्थ्यांच्या पालकांच्या ५१ सह्यांचे निवेदन देऊनसुद्धा सदर बस सुरू होण्याबाबत बेस्ट व्यवस्थापनाकडून विद्यार्थ्यांची ससेहोलपट होत आहे.

# ट्रक व इंडिगो कारच्या अपघातात १जणठार

नारायणगाव, ता. २९ - नारायणगाव येथील पुणे-नाशिक महामार्गावरील परेरा पेट्रोल पंपा समोरील कॉर्नरला ट्रक व इंडिगो कार यांची समोरासमोर धडक होऊन इंडिगो कारचा चालक जागीच ठार झाला तर २ जण जखमी झाले.

या अपघातात महमंद मुनीर शेख (६०) रा.नेवासा, जि. अहमदनगर यांचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती नारायणगाव पोलीस ठाण्यातून मिळाली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार महमंद शेख हे इंडिगो कारमधून शिर्डी येथे आंध्र प्रदेशातील व्यापारी व त्यांची पत्नी आणि मुलगा यांना घेऊन देवदर्शनासाठी गेले असताना दर्शन घेऊन पुण्याच्या दिशेने येत असताना नारायणगाव येथील परेरा पेट्रोलपंपाच्या कॉर्नरला वाहनाला ओव्हरटेक करताना नाशिकच्या दिशेने चाललेल्या ट्रकला समोरून धडक दिली या अपघातात शेख जागीच मृत्युमुखी पडले.

तर इंडिगोमधील व्यापारी एम. व्ही. महेश व एम.व्ही.प्रणीत (रा.चेन्नई) हे जखमी झाले. असून त्यांच्यावर नारायणगाव येथील खाजगी दवाखान्यात उपचार चालू आहेत.

# सिंधुदुर्गातील ई-पंचायत राज योजना अद्याप कागदावरच!

सिंधुदुर्ग, ता. २९ - भारत संचार निगमच्या अधिकाऱ्यांनी वेळकाढू भूमिका घेतल्याने शासनातर्फे राबविण्यात आलेला ई-पंचायतराज प्रकल्प बारगळल्यागत जमा आहे, अद्यापपर्यंत ग्रामपंचायतस्तरावर इंटरनेटचे कनेक्शन देण्यात न आल्याने ही वेळ आली आहे. त्यामुळे या योजनेअंतर्गत राबविण्याची घोषणा करण्यात आलेली योजना अद्यापपर्यंत कागदावरच राहिली आहे.

भारत संचार निगमच्या कार्यालयात आपण कनेक्शनसाठी अर्ज दिला आहे, मात्र अद्यापपर्यंत त्यावर कार्यवाही झालेली नाही, असे पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत कार्यालयातून सांगण्यात येत आहे. तसेच ग्रामपंचायतीत इंटरनेटची सुविधा नसल्याने येथे नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी पंचायत समितीस्तरावर नेण्यात आले आहेत. त्यामुळे या योजनेच्या मुख्य उद्देशाला हरताळ फासला जात आहे, असे ग्रामपंचायत प्रशासनाचे म्हणणे आहे.

दरम्यान, याबाबत अधिक माहितीसाठी भारत संचार निगमच्या कार्यालयात संपर्क साधला असता सद्यस्थितीत आपल्या कार्यालयात मोडेमची व्यवस्था करून देण्यात आलेली नाही, पोर्टची क्षमता संपली आहे त्यामुळे या अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे याबाबत वरिष्ठ स्तरावर वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे मात्र वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देत नाहीत, मात्र याचा फटका आम्हाला सहन करावा लागत असून ग्राहकांना आम्हाला उत्तर द्यावे लागत आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातून अनेक प्रस्ताव आले आहेत, मात्र अद्यापपर्यंत आवश्यक असलेल्या गोष्टी कार्यालयाकडे नसल्याने त्यांची मागणी पूर्ण करण्यात आलेली नाही, असे एका अधिकाऱ्याने नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर सांगितले.

# 'लक्ष्मीच्या नावानं चांगभलं'च्या गजरात बामणवाडीची वार्षिक यात्रा उत्साहात

कराड, ता. २९ - तालुक्यातील बामणवाडी येथील ग्रामदेवता श्री लक्ष्मीदेवीची वार्षिक यात्रा यंदा 'लक्ष्मीच्या नावानं चांगभलं'च्या गजरात सासनकाठ्या डौलात आणि गुलाब-खोबऱ्याच्या उधळणीत मोठ्या उत्साहात पार पडली.

भक्तांच्या हाकेला धावणारी आणि जागृत देवस्थान म्हणून समजल्या जाणाऱ्या या श्री लक्ष्मीदेवीच्या यात्रेला ग्रामस्थांनी यंदा प्रचंड उपस्थिती दाखविली होती. मुख्य यात्रेच्या आदल्या सायंकाळी देवीला सामूहिक बडाम (नैवेद्य) दाखविण्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी नवस फेडण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. त्याच रात्री भाविकांच्या मनोरंजनासाठी प्रसिद्ध लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम पार पडला.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी पालखी मिरवणूक, दुपारी जंगी कुस्त्यांचा फड आणि तिसऱ्या दिवशी खास महिला ग्रामस्थ वर्गासाठी कोल्हापूरच्या ललकार ऑक्रेस्ट्राचा कार्यक्रम पार पडला. अत्यंत उत्साहात ही वार्षिक यात्रा पार पडली. यात्रेच्या अगोदर सात दिवस अखंड पारायण सोहळा महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या उपस्थितीत पार पडला. त्याचप्रमाणे यात्रेनंतर भव्य क्रिकेटचे सामने आयोजित करण्यात आले होते.

यात्रा शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी समस्त ग्रामस्थ मंडळ, बामणवाडी आणि शिवशंभो मित्र मंडळाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# चेंबूरच्या सुख समाधान साई मंदिरात भव्य रामनवमी उत्सव

मुंबई, शुक्रवार - चेंबूरच्या घाटले गाव परिसरातील अरविंद पाटील येथील प्रसिद्ध साईभक्त व शिल्पकार गुरुदेव मांद्रेकर यांच्या पुढाकाराने सुख समाधान साई मंदिरात रविवार १ एप्रिल रोजी भव्य रामनवमी उत्सवाचे आयोजन केले आहे.

सालाबादप्रमाणे होणाऱ्या या रामनवमी उत्सवामध्ये रविवार १ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता साई पालखीची भव्य मिरवणूक आयोजित केली आहे. अरविंद पाटीलवाडीतून निघणारी ही मिरवणूक घाटलेगावमार्गे सुभाषनगरात फिरून पुन्हा अरविंद पाटीलवाडीत विसर्जीत होईल. या उत्सवासाठी प्रसिद्ध शिल्पकार गुरुदेव मांद्रेकर यांनी भव्यदिव्य अशी साईबाबांची मूर्ती साकारली आहे. तरी या पालखी मिरवणुकीत परिसरातील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन गुरुदेव मांद्रेकर यांनी केले आहे.

# नाशिकच्या पाण्यावर नगरकरांचा डोळा! पाणीवाटपाचा प्रश्न चिघळण्याची चिन्हे

नाशिक, ता. २९ - पाटबंधारे विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे नाशिक आणि नगर या दोन जिल्ह्यातील पाणीवाटपाचा प्रश्न चिघळणार असल्याचे चिन्ह दिसू लागले आहे. पाणी सोडण्याच्या ढिसाळ नियोजनामुळे नगरकरांना शेतीसाठी पाणी मिळणे आता अवघड झाले आहे. परिणामी नाशिककरांच्या हक्काच्या पिण्याच्या पाण्यावर पाटबंधारे विभागाचा आणि नगरकरांचा डोळा असून यातूनच या दोन जिल्ह्यात वाद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पिण्यासाठी लागणारे नाशिककरांचे हक्काचे पाणी धरणात असून आम्ही पाणीकपात करणार नाही, असे महापौरांनी पाटबंधारे खात्याकडे स्पष्ट केल्याने पाटबंधारे खाते चांगले अडचणीत आले आहे. काहीही झाले तरी नगरसाठी धरणातून पाणी सोडू द्यायचे नाही यासाठी शिवसेनेने बाह्या वर केल्या आहेत.

नाशिक येथील गौतमी-गोदावरी, कश्यपी, दारणा, गंगापूर या धरणांतून नाशिक आणि नगर जिल्ह्यांना पाणीपुरवठा केला जातो. पाण्याचे नियोजन करण्याची जबाबदारी पाटबंधारे विभागाची असून रब्बी हंगामात पाटबंधारे विभागाने गरजेपेक्षा अधिक पाणी या धरणामधून सोडल्याने आता धरणात फक्त नाशिककरांना उन्हाळ्यात पिण्यासाठी पुरेल इतकेच पाणी शिल्लक आहे. उन्हाळी पिकांसाठी धरणातून पाणी सोडावे असा तगादा नगर जिल्ह्यातील नेत्यांनी लावला आहे. परंतु धरणात शेतीसाठी सोडावे लागणाऱ्या पाण्याचा साठाच नसल्याने धरणातून पाणी सोडले अवघड झाले आहे. नगर जिल्ह्यातील शेतीसाठी देण्याचा पाण्याचा विषय सोडविण्यासाठी पाटबंधारे विभागाने पाणी कपात करण्याचे संकेत महापौर ॲड. यतिन वाघ यांना दिले होते. महापौरांनी चतुराई दाखवत धरणात शिल्लक असलेले पाणी नाशिककरांचे हक्काचे पिण्याचे असल्याचे स्पष्ट करत पाणी कपातीस नकार दिला. महापौरांच्या या निर्णयामुळे आता पाटबंधारे खाते चांगलेच अडचणीत आले आहे.

उन्हाळी पिकांसाठी ठरल्याप्रमाणे तीन वेळा पाणी धरणातून सोडावे यासाठी नगर जिल्ह्यातील नेत्यांनी कालच मुख्यमंत्र्यांना गळ घातली आहे. अशातच धरणात फक्त उन्हाळ्यात पुरेल इतकाच जलसाठा शिल्लक असल्याने शिवसेनेने धरणातून पाणी सोडण्यास केलेला विरोध, महापौरांनी पाणीकपातीस दिलेला नकार यामुळे काही दिवसातच नाशिक आणि नगर या जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. धरणातून यापूर्वी अनियंत्रित सोडल्या गेलेल्या पाण्यामुळे धरणातील जलशयाचा कमी झालेला साठा पाहून ऐन उन्हाळ्यात आपल्याला पाणीटंचाईला सामोरे जावे लागेल, याची भिती आता नाशिककरांना वाटू लागली आहे. यातूनच आंदोलने उभे राहू पाहत आहेत. शिवसेनेचे आक्रमक नेते सुधाकर बडगुजर, अजयदादा बोरस्ते यांनी तर वेळप्रसंगी जिवावर बेतले तरी बेहत्तर पण नाशिककरांचे हक्काचे पिण्याचे पाणी आता धरणातून सोडू देणार नाही, असा इशाराच दिला आहे.

### बसचालकाची गळफास घेऊन आत्महत्या

पुणे, ता. २९ - एका पीएमपीएमएलच्या बसचालकाने रहात्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. मारुती गंगाराम भुजबळ (४२) रा. पिंपरीगाव) असे आत्महत्या केलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले की, भुजबळ हे रात्री सर्वासह घरात झोपले होते. त्यांनी मध्यरात्री दोरीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. नैराश्यातून आत्महत्या केली असल्याची शंका नातेवाईकांनी व्यक्त केली. त्यांना तीन मुली व एक मुलगा आहे. त्यापैकी सहा महिन्यापूर्वी लहान मुलाचा मृत्यू झाला तर पत्नीचे दोन वर्षापूर्वी निधन झाले आहे. पिंपरी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### दोडामार्ग रुग्णालयाला शिवसेनेचा इशारा

सिंधुदुर्ग, ता. २९ - दोडामार्ग येथील राज्यस्तरीय डॉ. आनंदीबाई जोशी पुरस्कार प्राप्त ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर्स कर्मचारी रुग्णांना सेवा देत नसल्याच्या कारणाने शिवसेना-भाजपा, राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांसह सभापती व उपसभापती यांनी रुग्ण प्रशासनाला जाब विचारला. १५ दिवसांत सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# करवाढीच्या निषेधार्थ सराफांची दुचाकी रॅली

पुणे, ता. २९ - सराफ असोसिएशनच्या वतीने आज करवाढीच्या निषेधार्थ दुचाकी रॅली काढण्यात आली. भक्ती-शक्ती ते पिंपरीतील आंबेडकर चौकादरम्यान रॅली काढण्यात आली. रॅलीत परिसरातील सहाशे दुचाकीचालकांनी सहभाग घेतला. असोसिएशनचे अध्यक्ष रमेश सोनिगरा, चंदुकाका सराफ, पी. एन. गाडगीळ, कुबेर गाडगीळ आदी यावेळी सहभागी झाले होते. व्हॅट एक टक्के, जकात दोन टक्के, सेवा कर सुमारे बारा टक्के, टीडीएस एक टक्के आणि एक्साईज ड्युटी चार टक्के करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांवर या करवाढीचा बोजा पडणार आहे. प्रती ग्रॅमला तीन हजार रुपये जादा द्यावे लागणार आहेत. ही करवाढ त्वरीत रद्द करावी, अशी मागणी सराफ व्यावसायिकांनी केली. दुचाकीस्वारांनी काळे झेंडे हातात घेऊन जुलमी करवाढीच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केली.

**सूचना**

श्रीनिवास कॉटन मिल्स लि. करिता...

( संचालक )

### शहर वाहतूक शाखेची १५८ वाहनांवर कारवाई

नांदेड, ता. २९ - पोलीस अधीक्षक शहाजी उमाप नांदेड यांनी दि. २७ मार्च २०१२ रोजी नांदेड शहरातील वाहतूक सुधारण्यासाठी शहरातील भाग्यनगर, शिवाजीनगर, वजिराबाद, विमानतळ, नांदेड ग्रामीण, ईतवारा या प्रत्येक पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची पथके तयार करून, शहरातील वाहतूक सुधारण्यासाठी कार्यवाही करण्यात आली आहे.

सदर कारवाईत पो. स्टे. इतवारा, पो. स्टे. शिवाजीनगर, पो. स्टे. वजिराबाद, पो. स्टे. भाग्यनगर, पो. स्टे. विमानतळ, पो. स्टे. नांदेड ग्रामीण तसेच शहर वाहतूक शाखेकडून ट्रक ०२, जीप-कार ११, ॲटो २५, मोटार सायकल ११६, ट्रॅव्हल्स ०३, मुंबई पोलीस कायदा ०१, अशा एकूण १५८ वाहनांवर कारवाई करून एकूण २३ हजार ८०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

# शाई धरणाच्या ठेकेदाराच्या विरोधात किन्हवली पोलीस ठाण्यावर मोर्चा

मुरबाड, ता. २९ - मुरबाड-शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेले शाई धरण रद्द व्हावे यासाठी परिसरातील शेतकरी सतत संघर्ष करीत आहेत. मात्र, या संघर्षाला न जुमानता शासनाने मनमानी पद्धतीने शाई धरण शेतकऱ्यांवर लादण्याचे काम सुरू केले आहे. शाई धरणाचे ठेकेदार मे. एफ.ए.कन्स्ट्रक्शन यांनी सर्व कायदे व नियम धाब्यावर बसवून मनमानीपणे धरणाचे काम पुढे रेटण्याचे सुरूच ठेवले असल्याने या परिसरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून त्याला आवर न घालता पोलीस संरक्षण देवून हातभार लावणाऱ्या प्रशासनाविरोधात शाई धरण संघर्ष समिती शेतकऱ्यांनी किन्हवली पोलीस ठाण्यावर मोर्चा काढून निषेध केला.

साखरपाडा-बोरावली मार्गावर उतरविण्यात आलेली ठेकेदाराची मशिनरी परत न्या, तसेच उंगबरवाडी येथील बेस कॅम्पचे बेकायदेशीर बांधकाम तोडण्यासाठी ढाढरे ग्रामपंचायतीस बंदोबस्त द्या, या मागण्यांचे पत्र २५ मार्च रोजी पोलीस ठाणे किन्हवली यांना दिले होते. मात्र चार दिवस उलटूनही कुठलीही मदत न मिळाल्याने अखेर किन्हवली पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला. मात्र कुठलाही सक्षम अधिकारी न आल्याने अखेर मोर्चेकरांनी ठिय्या आंदोलन केले. या वेळी मोठ्या संख्येत शेतकरी महिला वर्ग उपस्थित होते. तर पांडुरंग वारघडे, प्रशांत सरखोत, दिगंबर विशे, लियाकत शेख, नामदेव गायकवाड, देसले, तानाजी घरत (तात्या) यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत शासनाचा निषेध केला तर मोर्चाला थोपविण्यासाठी मोठ्याप्रमाणात पोलीस फौज फाटा होता.

## ऊसतोडणी मजुरांच्या झोपड्यांत जबरी चोरी

अकोले, ता. २९ - ऊसतोडणी कामगारांच्या झोपड्यांमध्ये घुसून भरदिवसा रोख रकमेसह सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना अकोले (जि. नगर) तालुक्यातील गणोरे येथे घडली. अज्ञात चोरटे ऊसतोडणी मजुरांच्या झोपडीत शिरले, त्यांनी पेट्या उचकटून रोख ३० हजार रुपये व ५ हजार रुपये किमतीचे सोने असा एकूण ३५ हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबत मच्छिंद्र आंबू चव्हाण (रा. तळेगाव ता. चाळीसगाव, जि. जळगाव) यांच्या फिर्यादीवरून अकोले तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. गोरक्ष आंबु चव्हाण, उत्तम सीताराम चव्हाण, उत्तम जाधव, ज्ञानेश्वर मानसिंग चव्हाण, वाल्मीक बालचंद्र राठोड, मकरंद कतीराम राठोड या ऊस तोडणी मजुरांच्या झोपड्यात ही चोरी झाली. सर्व ऊसतोडणी मजूर आपल्या झोपड्यांना ताट्या लावून ऊस तोडणीला गेले होते.

# आज औरंगाबादेत सराफ असोसिएशनचा भव्य मोर्चा

रत्नागिरी, ता. २९ -ऑल इंडिया सराफ असोसिएशन अंतर्गत तसेच महाराष्ट्र राज्य सराफ सुवर्णकार असोसिएशन अंतर्गत रत्नागिरी तालुका सराफ सुवर्णकार असोसिएशनने बेमूदत संप पुकारला आहे. ३० मार्च रोजी औरंगाबाद येथे संघटनेतर्फे बजेटमध्ये सोने दागिन्यांवर लावण्यात आलेले नवीन कर व इतर कर लावण्याविरोधात भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात रत्नागिरीतील सुवर्णकार असोसिएशनचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. दरम्यान या बंदचा एक भाग म्हणून रत्नागिरीतीलही सर्व सुवर्णकारांची दुकाने मंगळवारपासून बंद ठेवण्यात आली आहेत.

२०१२च्या अर्थसंकल्पामध्ये सोने दागिन्यावर लावण्यात आलेल्या नवीन कर व इतर करांच्या बोजामुळे सराफ सुवर्णकार बेजार झाले आहेत. आयत कर २ टक्क्यांवरून ४ टक्के वाढ, एक्साईज ड्युटी १ टक्के, प्रत्येकी २ लाखांच्या रोख खरेदीवर १ टक्के टिसीएसप्रमाणे कर, व्हॅट टॅक्स १टक्के इतर शहरात लागणारा वेगवेगळा जकात कर असा बोजा लादला आहे.

यामुळे अधिक महाग झालेले सोने आणखीनच महाग असल्याचे असोसिएशनचे म्हणणे आहे. यामुळे सर्वसामान्य ग्राहकांचे सोने खरेदी करताना कंबरडेच मोडणार आहे. या लावलेल्या नवीन करांच्या निषेधार्थ दुकानदार, व्यापार, सुवर्णकार यांनी बेमुदत संपाची हाक दिली आहे. ३० मार्च रोजी शासनाच्या या धोरणाविरोधात औरंगाबाद येथे भव्य मोर्चा आयोजित केला आहे. या मोर्चात रत्नागिरीतील सर्व सुवर्णकार सराफ संघटना भाग घेणार आहेत.

### रशियाचा उपग्रह कोसळला

मॉस्को, ता. २९ - हवामानाची माहिती देणारा रशियाचा उपग्रह अंटार्क्टिकावर कोसळून नष्ट झाला. गेली चार दशके हा उपग्रह पूर्ण क्षमतेने कार्यक्षम होता. उपग्रह नष्ट झाल्याने रशियाला मोठे नुकसान सोसावे लागणार आहे. २६ मार्च १९६९ मध्ये उपग्रह अवकाशात सोडण्यात आला होता. हा उपग्रह पृथ्वीपासून ६५० कि.मी. अंतरावर भूस्थिर अवस्थेत ठेवण्यात आला होता. त्याचे वजन १२०० ते १४०० किलो दरम्यान होते. आकाशातील ढगांची गर्दी, बर्फाळ प्रदेश, किरणोत्सर्गासह दिवस आणि रात्रीच्या हवामानाचा अंदाज याच उपग्रहद्वारे घेण्यात येत होता.

# सांगली जिल्हा बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केले

(पान १ वरून चालू)

**'यशवंत'ला कर्ज देण्यासाठी जोरदार चर्चा**

पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात अग्रेसर समजल्या जाणाऱ्या या बँकेच्या संचालक मंडळाच्या बरखास्तीचे वृत्त सांगलीत धडकताच विविध प्रकारच्या चर्चेला ऊत आला. खानापूर तालुक्यातील नागेवाडी येथील यशवंत सहकारी बँकेला दिलेल्या कर्जामुळे या बँकेवर ही नामुस्कीची पाळी असल्याची चर्चा संपूर्ण शहरात ऐकण्यास मिळत होती. या कारखान्याचे कर्ज प्रकरण बँकेला भोवल्याचे बोलले जात होते.

**शैलेश कोनमिरे यांची प्रशासकपदी नियुक्ती**

आज 'नाबार्ड'ने सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला संचालक मंडळाची बरखास्तीचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर लगेच या बँकेवर जिल्हा उपनिबंधक शैलेश कोतमिरे यांची बँकेच्या प्रशासकपदी नियुक्ती केली. दोन दिवसांपूर्वीच माजी आमदार दिनकर पाटील यांची या बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. मात्र निवडीचा गुलाल त्यांच्या कपड्यावरून निघालेला नसताना त्यांना आपल्या सहकाऱ्यांसह पायउतार व्हावे लागले आहे. दिनकर पाटील हे तासगाव तालुक्यातील मांजर्डे गावचे असून ते गृहमंत्री आर.आर.पाटील यांचे निकटचे सहकारी समजले जातात. दिनकर पाटील यांनी मात्र ही बँकेवरील कारवाई राजकीय आकसातून केल्याचा आरोप केला आहे. पाटील म्हणाले की, बँकेची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. मध्यंतरी दुष्काळी परिस्थितीमुळे कर्जवसुली राहिली. परंतु बरखास्तीचा निर्णय घेण्याइतपत बँकेची परिस्थिती गंभीर नाही. खरे ही कारवाई राजकीय आकसातून झाली आहे.



**श्रीराम नवमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह**

मुंबई, गुरुवार- श्रीराम जन्मानिमित्त २३ मार्च ते २ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे सामुदायिक पारायण सुरू आहे. ट्रस्टी, व्यापारी व कापूस बाजार कामगार मंडळातील अधिकारी तसेच वासुदेव महाराज नारखेडे, ह.भ.प. श्री. प्रभाकर महाराज आव्हाड व ह.भ.प. श्री. गणपत महाराज जगताप (आळंदी) हे सामुदायिक पारायणाचे मार्गदर्शन करीत आहेत.

महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने रात्री ८ ते ११ या वेळेत सुरू असून मृदुंगमणी गणपत लेकावळे, तुकाराम व ज्ञानेश्वर सांगळे, दिनेश मिसाळ, माऊली शिरसाट आणि विणेकरी म्हणून नामदेव किरवे, गायनाचार्य हरिभाऊ रिंगे तसेच ह.भ.प. खराडे, ढाकणे, गीते, साळुंखे, मधुकर मनवे, संदिप कुळेकर आदींची साथ लाभली आहे.

रविवार १ एप्रिल रोजी सकाळी १० ते १ या वेळेत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. पांडुरंग महाराज आव्हाड-सिन्नर यांचे रामजन्माचे कीर्तन होणार असून दुपारी २.३० नंतर पालखी सोहळा होईल. सदर कीर्तन महोत्सवाचा सांगता सोहळा सोमवार २ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते ६ काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तरी भाविकांनी या सुवर्ण संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे विश्वस्त मंडळाने आवाहन केले आहे.

# दोन गुराख्यांच्या हत्येप्रकरणी
## एकास जन्मठेपेची शिक्षा! दुसरा निर्दोष

रत्नागिरी, ता. २९ - आंबा कलमाच्या बागेत दोघा गुराख्यांची हत्या केल्याचा आरोप असलेल्या अकाश चक्रसिंह ठाकूर या गुराख्याला जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. या गुन्ह्यातून ठाकूर यांच्या सहकाऱ्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

रत्नागिरी तालुक्यातील टिके-चाळकेवाडी येथील नंदकुमार चाळके यांच्या कलमाच्या बागेत ३ मार्च २०११ रोजी ही घटना घडली होती. शहरातील किल्ला येथील राहणाऱ्या नितीन लाखण यांनी चाळकेवाडी येथे कराराने आंबा बाग घेतली होती. या बागेत आकाश ठाकूर (२४) रा. महादेववाडा-कैकाली, नेपाळ याला राखणीसाठी ठेवले होते. या बागेच्या शेजारी पिलणकर यांच्या बागेत विजय रामबहादूर सीजापती (२२) रा. राजीपूर आंचनशेती, नेपाळ हा गुराखीदेखील राखणीस होता. या दिवशी ठाकूर व सीजापती या दोघांच्या जोडीला आणखी दोन सहकारी या दिवशी रात्री दाखल झाले होते. या सर्वांनी मिळून बागेत मेजवानीचे आयोजन केले होते. मेजवानीच्या कार्यक्रमादरम्यान ठाकूर व सीजापती तसेच त्या ठिकाणी आलेले पद्मदेव बहादूर मल्ला (२२) व कृष्णा मल्ला (१६) दोघेही रा. नेपाळ यांच्यामध्ये जोरदार बाचाबाची झाली. हे प्रकरण हातघाईवर जाऊन आकाश ठाकूर व सीजापती या दोघांनी मल्ला बंधूंना लाकडी दांडा व मोठे जांभा दगड यांच्या छातीपोटावर टाकून गंभीर मारहाण केल्यानंतर सुमारे १५ ते २० मीटर अंतरावर मल्ला यांचे मृतदेह ओढत नेत टाकले होते.

## बारामतीत आढळला कॉलेज युवतीचा मृतदेह

बारामती, ता.२९- शहरातील एमआयडीसी परिसरात असलेल्या आयएसएमटी कंपनीच्या पाठीमागील बाजूस असलेल्या मोकळ्या मैदानात एका कॉलेज युवतीचा मृतदेह आढळून आल्याची घटना आज उघडकीस आली. आशिया इलाही तांबोळी (१७) असे या मृत युवतीचे नाव असून ती शहरातील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात ११वी इयत्तेत शिकत होती. आज सकाळी आशियाचा मृतदेह तोंडातून फेस आलेल्या अवस्थेत आढळून आला. यावेळी मृतदेहाजवळ घुटमळणाऱ्या विनोद दौलत कांबळे (२१) नावाच्या तरूणाला पोलिसांनी तपासासाठी ताब्यात घेतले आहे. विनोद आणि आशिया हे दोघे एकमेकांना गेल्या दोन वर्षांपासून ओळखत होते. मात्र आशियाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे समजू शकलेले नाही. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# मानवनिर्मित व्यवस्थेत असलेले भेद दूर करून विकासकामांना प्रारंभ करा

जळगाव, ता. २९ - पदवी घेऊन, पुस्तके लिहून समाजाला विकासाच्या गोष्टी न शिकवता मानवनिर्मित व्यवस्थेत असलेल्या त्रुटी व भेद दूर करण्याचा प्रयत्न करून विकासकामांना प्रारंभ करा, असे प्रतिपादन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या निलिमा मिश्रा यांनी केले आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रौढ व निरंतर शिक्षण विस्तार सेवा विभागांतर्गत कार्यरत समाजकार्य अभ्यास शाखेच्या वतीने आयोजित सोशल वर्क एज्युकेशन रिट्रोस्पेट ॲन्ड प्रास्पेक्ट या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रांचे उद्‌घाटन करताना मिश्रा यांनी वरील संदेश दिला. कुलगुरु प्रा. सुधीर मेश्राम यावेळी अध्यक्षपदी विराजमान होते.

मिश्रा यांनी यावेळी आपले अनुभव कथन केले. गावातील गरिबी पाहून आपण व्यथित झालो आणि त्यातूनच समाजासाठी काहीतरी करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी आपणास समाजकार्याचे शिक्षण घेण्याची गरज वाटली नाही तर संवेदना महत्त्वाच्या वाटल्याचे त्यांनी सांगितले. आपण पदव्या घेऊन समाजाला शिकवायला निघतो. मात्र समाजात पूर्वीपासून परंपरा आहेत. नियम आहेत. समाजाला संस्कृतिसुद्धा आहे. त्यामुळे समाजाला विकास शिकवायचा नाही तर मानवनिर्मित व्यवस्थेने जे भेद व त्रुटी निर्माण केले आहेत , त्या दूर करण्याचे आपण ठरविले आहे. २७ वर्षांचे नियोजन केलेऋ त्यातील पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू झाले असल्याचे मिश्रा यांनी सांगितले.

कुलगुरू मेश्राम यांनी यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात समाजकार्य विषयाचे महत्त्व स्पष्ट केले. आरोग्य, उद्योग, पर्यावरण आदींमध्ये समाजकार्याची महत्त्वाची भूमिका आहे. मात्र काही सयंसेवी संस्था दिखाऊपणाचे काम करीत असल्यामुळे समाजकार्य विषयाला अजूनही ओळख प्राप्त होऊ शकली नसल्याचे त्यांनी सांगितले.

# नेतेच तुरुंगात गेल्याने महापालिकेत शांतता महापौर निवडीच्या कार्यक्रमातही शांतताच

जळगाव, ता. २९ - पालिकेच्या घरकूल गैरव्यवहार प्रकरणात सत्ताधारी गटाचा प्रमुख नेता प्रदिप रायसोनी तुरुंगात आहे तर प्रमुख नेतृत्वाला सुरेश जैन यांना तात्पुरता जामीन मिळून त्यांच्यावर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेत निरव शांतता असून नव्या महापौर निवडीचाही गाजावाजा नाही. त्यातच आ. जैन यांच्यासाठी विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याचा निंदनीय प्रकार घडल्याने शहरात संताप व्यक्त करण्यात येत आहे.

जळगाव पालिकेच्या घरकूल गैरव्यवहाराचा गुन्हा सहा वर्षे जुना असला, तरी त्याला जानेवारी २०१२ मधील चालना मिळून पालिकेतील सत्ताधारी गटाचे कोणत्याच पदावर नसले तरी सर्वेसर्वा म्हटले जाणारे प्रदिप रायसोनी यांना २८ जानेवारी रोजी अटक झाली.

रायसोनी लगेच सुटतील असे त्यांच्या समर्थकांना वाटत असतानाच त्यांची मुक्तता तर झाली नाहीच पण पालिकेतील सत्ताधारी गटाचे नेतृत्व समजले जाणाऱ्या आ. सुरेश जैन यांनाही १० मार्चच्या रात्री अटक झाली.

रायसोनी यांच्या पाठोपाठ जैन यांनाही अटक झाल्यानंतर त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांत प्रचंड खळबळ माजून त्यांना हादरा बसला. त्यानंतर जैन यांच्या अटकेच्या निषेधार्थ मोर्चा, रॅली, जिल्हा बंद पुकारण्यात येऊन प्रशासनावर दबाव टाकण्याचा प्रयत्न झाला. जैन यांनीही पोलीस प्रशासनाविरुद्ध असहकाराची भूमिका घेतली. त्यांनी विनाकारण आदळआपट करून गंभीर दुखणे ओढवून घेतल्याचे म्हटले गेले.

न्यायालयीन कोठडी देण्यात आल्यानंतर जैन यांच्या छातीचे दुखणे वाढले. त्यामुळे त्यांच्या डॉक्टरांकडून हृदय शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. या कारणावरूनच जैन यांना तात्पुरता जामीन मिळाला व मुंबईला जाऊन त्यांना शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली. प्रदीप रायसोनी यांना आत जाऊन आताच दोन महिने पूर्ण झाले आहेत. उच्च न्यायालयाने त्यांचा जामीन फेटाळून लावल्याने त्यांची आणखी दोन-चार महिने सुटका होणे शक्य नाही, असे विधी तज्ज्ञांचे मत आहे. तसेच सुरेश जैन हे सुद्धा बाहेर असून आत असल्यासारखीच स्थिती आहे.

# रेती उत्खननाने तिवरांची झाडे व पर्यावरण धोक्यात!

ठाणे, ता.२९- मुंब्रा-दिवा खाडी क्षेत्रात होणाऱ्या अवैध रेती उत्खननाने खाडीलगतची तिवराची झाडे आणि पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला आहे. या रेतीमाफियांना वेळीच लगाम न घातल्यास ठाणेकरांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे.

मुंब्रा-दिवा परिसरात रेतीमाफियांनी रेती उत्खननाच्या कारवायांमुळे खाडीलगतच्या तिवारांची कत्तल खुलेआम होतेय. तर रेतीमाफिया मात्र लाखो रुपयांची कमाई करीत सरकारी तिजोरीवर डल्ला मारीत आहे. अवैध उत्खनन केलेल्या रेतीच्या वाहतुकींसाठी मात्र रेतीमाफिया शेकडो ट्रक खाडीत भराव टाकून त्यावर रस्त्यांची निर्मिती करण्यात आली. याच रस्त्यावरून वाहनातून रेतीची वाहतूक करण्यात येत आहे.

खाडीत भराव टाकल्याने खाडीलगतच्या तिवरांची मोठ्याप्रमाणात कत्तल झाली आहे. यामुळे येणाऱ्या काळात मुंब्रा-दिवा परिसरात पाण्याचे साम्राज्य होऊन वासियांना मोठा झटका लागण्याची संभावना निर्माण झाली आहे. तर रेतीमाफिया मात्र मुंब्रा-दिवा दरम्यानच्या रेल्वे पुलाच्या आजूबाजूला रेती उत्खनन करीत असल्याने रेल्वेच्या पुलाचे पिलरच आता ठिसूळ होत असल्याचे दिसत आहे. याबाबत मुंब्रा पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, माहिती हवी असल्यास माहितीच्या अधिकाराचा वापर करा, असा सल्लाच त्यांनी दिला. याबाबत तहसीलदार राजेंद्र बोरकर म्हणाले की, तक्रारी वाढल्या आहेत. याबाबत बोर्डाला कळविण्यात आले असून त्या विभागाद्वारे कारवाई करण्यात येणार असल्याचे मत व्यक्त केले.

**प्रथम पुण्यस्मरण**



स्व.फाल्गुन व।। ११ शके १९३३
(दि. ३० मार्च २०११)

**कै. सौ. ज्योती प्रकाश तांबे** (डोंबिवली)

जन्म आणि मृत्यू नाही कुणाच्या हाती
निरोप घेतलास तू ह्या जगाचा अवेळी
क्षणोक्षणी स्मरतो तुझ्या आठवणी
पुनर्जन्म घेऊन येशील का परतुनी

**पती- प्रकाश व मुली-जावई-नातवंडे आणि सर्व नातेवाईक तसेच समस्त ज्योती एन्टरप्राईजेस स्टाफ**

# संतप्त शेतकऱ्यांचे आंदोलन
## थकीत पैसे लवकर देण्याचे आश्वासन

सिंधुदुर्ग, ता.२९- इन्शुली गावठणवाडी येथील शेतकऱ्यांनी दोन महिन्यांचे सुमारे अडीच लाख रुपये न दिल्याने शालिनी डेअरी फार्मची बोलेरो गाडी रोखून धरली. अखेर थकीत पैसे लवकरच देण्याचे आश्वासन डेअरी फार्मचे व्यवस्थापक निशाद सप्रे यांनी दिले आहे.

इन्शुली येथे शालिनी डेअरी फार्मच्या वतीने इन्शुली येथे दूध संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांना प्रतिलिटर ३८ रुपये दर देण्यात येतो. प्रतिदिन या संकलन केंद्रात १०० लिटर दूध संकलित होते. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून शेतकऱ्यांना दुधाचे पैसे व खाद्य वेळेत देण्यात आले नाही. याबाबत शेतकऱ्यांनी वेळोवेळी पाठपुरावाही केला. मात्र पैसे देण्यात न आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी शालिनी डेअरी फार्मची बोलेरो जीप ६० लिटर दुधाच्या कॅनसह रोखून धरली. थकीत वेतनामुळे शेतकऱ्यांचे प्रतिदिनी १०० लिटर दुधाचे नुकसान होत असून यासाठी शालिनी डेअरी फार्मचे व्यवस्थापक जबाबदार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. डेअरी फार्मचे व्यवस्थापन निशाद सप्रे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी शेतकऱ्यांचे वेतन थकीत असल्याचे मान्य केले. तांत्रिक कारणामुळे रक्कम देण्यात विलंब झाला असून लवकरच कर्जाच्या रकमेची पूर्तता झाल्यावर शेतकऱ्यांना वेतनाची रक्कम देण्यात येणार आहे.

# कोकण रेल्वेच्या शेकडो कामगारांच्या बदल्या अन्यायकाररित्या केल्याचा आरोप

रत्नागिरी, ता.२९- कोकण रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक भानू प्रकाश तायल हे कोकण रेल्वेची मालमत्ता स्वतः ची वडिलोपार्जित मालमत्ता असल्याप्रमाणे विकण्याचे षड्‌यंत्र रचत असल्याचा आरोप कोकण रेल्वे एम्प्लॉईज युनियनने केला आहे. कोकण रेल्वेतील शेकडो कामगारांच्या अन्यायकारक बदल्या करून त्यांचा आवाज दडपण्याने कृत्य तायल करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी तायल यांच्या कारभाराची व कारनाम्याची सीबीआयमार्फत चौकशी करावी व कामगारांना न्याय द्यावा, अशी मागणी व निषेधाचे फलक कोकण रेल्वे मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेल्या केंद्रीय रेल्वे मंत्री मुकुल रॉय यांच्याकडे केली आहे.

मुकुल रॉय यांनी रेल्वे मंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्याने रेल्वे तिकीट दर कमी केले. त्यामुळे सामान्य जनतेला दिलासा देणाऱ्या निर्णयाचे के.आर.सी.एम्प्लॉईज युनियनने स्वागत केले आहे. आपण रेल्वे मंत्रीपदाची धुरा सांभाळत असताना आपणाकडून रेल्वेची प्रगती व्हावी, अशी कोकण रेल्वे कामगारांची इच्छा आहे. कोकण रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक भानू प्रकाश तायल यांच्या कारभाराची अशीही मागणी के.आर.सी. एम्प्लॉईज युनियनचे विभागीय सचिव उमेश गाळवणकर यांनी केले आहे.

**पुण्यस्मरण**
**चोविसावा स्मृतिदिन**



**कै.सौ. सुमती केशव सावंत**

**आई, तुला जाऊन चोवीस वर्षे पूर्ण झाली. तुझी आठवण सतत मनात असते.**
**तुझ्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना**

**-:आपले:-**

सौ. व श्री. बापू केशव सावंत
सौ. व श्री. शरद केशव सावंत
श्री व सौ. चंद्रकला बाळाजी राणे
श्री. व सौ. रुपाली रमाकांत राणे
**नातवंडे-** शलाका, संपदा, सुशील, सुषमा, सुचिता, लीना, सायली

भारत सरकार पुरस्कृत संस्थेतर्फे
१०/१२ पास नापास मुला मुलींसाठी
पाहिजेत ट्रेनी नर्सिंग असिस्टंट
शिकताना महिन्याला कमवा २,०००/- ते ३,०००/-
100 % नोकरीची लेखी हमी
पास झाल्यावर रू. ५००/- ते ८००/- प्रति दिवस कमवा
डॉ. गायकवाड इंस्टीट्यूट (स्थापना - १९९६)
२०३, आकांक्षा, प्लाझासमोर, सिलेक्शनवरती, दादर (वेस्ट), स्टेशनाजवळ २४३२६०७७ / २४३७०१५४
• मेघमहल, दत्तपाडा, बोरिवली (ईस्ट) २८७०६७३९
• ३१०, सुधांशु चेंबर्स, संतोष हॉटेलवरती, कल्याण (वेस्ट) ०२५१-२३०२९८६.
Website : www.drgaikwadinstitute.com

**नवाकाळ**

मुंबई ■ शुक्रवार, ३० मार्च,२०१२ ■पान-५

GOVT. OF INDIA (PROMOTED)
FOR 10/12 PASS/FAIL
100% JOB GUARANTEE
EARN & LEARN STIPEND 35 - 40,000
SUNDAY BATCHES AVAILABLE
DIRECT 2ND YR EXAM FOR EXPERIENCED STUDENT
PRACTICAL NURSING / DMLT
EARN PER DAY
RS. 500/- TO 800/-
X-RAY / ECG /OPTOMETRY
DIETICIAN / NATURECURE / SPA
DR. GAIKWAD INSTITUTE ( Estd - 1996 )
DADAR - 203, Akanksha, Opp. Plaza Ab Selection, Dadar (West). 24367386 / 24326077
BORIVALI - Megh Mahal, Dattapada, Borivali (E). 28706739 / 64287933
KALYAN - 310, Sudhanshu Chembers, Above Santosh Hotel, Kalyan (West). 0251-2302986
Website : www.drgaikwadinstitute.com

# फकिराच्या पुण्याईवर जगणारे कुबेर

**-भारत कदम**

**राजभोग**

शिर्डीच्या साईबाबांची किमया अगाध आहे. बाबांच्या किमयेचा साक्षात्कार पटलेले जगभरात करोडो भाविक आहेत. स्वत: बाबा गेल्या शतकात अक्षरश: फकिरासारखे जीवन जगले. आपल्या दैवी शक्तिने आपल्या हयातीतच डोळे दिपवून टाकणारे चमत्कार केले. मात्र आपल्या उभ्या हयातीत त्यांनी कुणाकडून एका पैशाचे दान घेतले नाही. त्यांनी भर दिवाळीत तेलाऐवजी पाण्याने दिवे पेटविले. ज्याच्या दारी पंचमहाभूते पाणी भरीत होती आणि ३३ कोटी देव ज्यांचे उत्तिष्टे काढीत होती त्या सर्व देवांना आपल्यात सामावून घेतलेल्या साईबाबांना काय कमी होते? परंतु साईबाबा 'भिक्षां देई' म्हणत शिर्डीत फकिरासारखे जगले.

आज बाबांच्या पुण्याईने साई संस्थानात दरदिवशी कोट्यवधी रुपये दानपेटीत जमा होत आहेत. मात्र या पैशावरच डोळा ठेवून सत्ताधारी राज्यकर्त्यांनी आपले नातेवाईक व निकटवर्तीयांना या साई संस्थानावर विश्वस्त म्हणून पुन्हा एकदा बसविले आहे. वर्षानुवर्षे हाच खेळ चालत आला आहे. राज्यकर्त्यांचे पिट्टेच या विश्वस्त मंडळावर बसत आले आहेत. ज्या बाबांनी सर्वसंग त्यागाचा धडा जनतेला दिला व फकिरी स्वीकारली त्या साईबाबांच्या शिकवणीला व आचरणाला हरताळ फासण्याचे काम विश्वस्त मंडळाकडून सुरू आहे. शिर्डीच्या साई संस्थानाकडे हे विश्वस्तच 'भक्तीपीठ' म्हणून न पहाता त्याकडे 'सत्तेचे पीठ' म्हणून पाहात आहेत. त्यामुळे साई संस्थान हा सत्तेचा आखाडा बनला आहे. 'सबका मालिक एक' ही बाबांच्या सच्च्या भक्तांची मनोमन धारणा आहे. तर 'सबका मालिक बाबा' (मुख्यमंत्री) अशी धारणा आहे.

विश्वस्तांची नेमणूक करण्याचा अधिकार बाबांचा म्हणजेच पृथ्वीराज चव्हाण यांचा आहे. त्यांच्या हातात न्याय आणि विधी खाते आहे. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. त्यांनी विश्वस्तांची नेमणूक करताना सत्तेत त्यांचा मित्र पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला प्रथेप्रमाणे अध्यक्षपद सोडून जागा दिल्या. बुधवारी जाहीर झालेली साईसंस्थानाच्या विश्वस्तांची यादी म्हणजे काँग्रेस नेत्यांच्या नातेवाईकांची व एकनिष्ठांची मांदियाळीच आहे.

वास्तविक २००४ च्या कायद्याप्रमाणे साईसंस्थानाचे विश्वस्त नेमतांना साईभक्तांमधून १० विश्वस्त निवडायचे बंधन आहे. मात्र या कायद्याला सरकारने कधीच बासनात गुंडाळून ठेवले आहे. कुणी सुरेश वाधवा नावाचा साईभक्त वर्षोनुवर्षे विश्वस्त म्हणून निवडला जातो. हा वाधवा मुंबईतील मोठा उद्योजक आहे. हा मालदार विश्वस्त साई संस्थानाला मोठमोठ्या देणग्या देतो. तसेच तो अध्यक्ष जयंत ससाणे यांचा खास माणूस आहे. तो मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचाही जवळचा माणूस आहे. त्यामुळे तोच साईभक्त म्हणून विश्वस्त होतो. साईभक्त ठरवायचा हा मालदार निकष अजब आहे. जे देणग्या देऊ शकत नाहीत ते साईभक्त नाहीत असेच या निकषांवरून ठरते.

### तेच तेच चेहरे नव्याने विश्वस्त

वास्तविक मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार मंगळवारी रात्री बारा वाजेपर्यंत शिर्डीच्या साई संस्थानाच्या विश्वस्तांची नेमणूक करणे गरजेचे होते. मात्र या नेमणुका बुधवारी सकाळी झाल्या. त्यामुळे हा एकप्रकारे न्यायालयाचा अवमान आहे. बुधवारी नेमलेल्या विश्वस्तांची नावे व चेहरे पाहिले की, राज्यकर्त्या पक्षांनी आपआपली मोर्चेबांधणी कशाप्रकारे केली आहे ते समजते.

श्री साई संस्थान न्यासाचे अध्यक्ष जयंतराव ससाणे हे काँग्रेसचे माजी आमदार श्रीरामपूर मतदारसंघातून ते दोनदा आमदार म्हणून निवडून आले होते. गेली ८ वर्षे व पुढील ३ वर्षे आता ते साई संस्थानचे विश्वस्त असणार आहेत. ससाणे यांना थेट दिल्लीकरांचा आशीर्वाद असल्याने राधाकृष्ण विखे-पाटलांचेही काही चालत नाही. ससाणे पुढे आपल्यालाच भारी पडतील म्हणून त्यांना अध्यक्षपदावरून हटविण्यासाठी राधाकृष्ण विखे-पाटलांनी जंगजंग पछाडले. मात्र दिल्लीकरांच्या कृपेने ते अध्यक्षपदावर ठाण मांडून बसले आहेत. त्यांच्याविरोधात उच्च न्यायालयात भ्रष्टाचाराचे अनेक खटले प्रलंबित आहेत. परंतु काँग्रेस संस्कृतीत मुरलेला हा पट्ट्या कशालाच भीक घालत नाही. या साई संस्थानाचे उपाध्यक्ष आहेत. राष्ट्रवादीचे घन:श्याम शेलार, राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी अध्यक्ष जयंत ससाणे यांच्या तंगड्यात तंगडे अडकविण्यासाठी आणि ससाणेंना आडवे पाडण्यासाठी जे तीन सरदार पाठविले आहेत त्यात शेलार हे प्रमुख आहेत. ससाणे यांचे डावपेच हाणून पाडण्यासाठी राजेंद्र पिपाडा आणि सुरेंद्र खर्डे यांना सज्ज ठेवण्यात आले आहे. घन:श्याम शेलार हे पूर्वी भाजपात होते. युतीच्या काळात ते एस्.टी. महामंडळावर संचालक होते. नंतर ते शिवसेनेत गेले. मग नंतर राष्ट्रवादीत आले. ते बबनराव पाचपुतेंचे एकनिष्ठ समजले जातात. श्रीगोंद्याच्या राजकारणात भानुदास मुरकुटे यांचा मुलगा सिद्धार्थ मुरकुटे यांचा पत्ता कट करण्याचे काम या शेलारमामांनी केले आहे. राजेंद्र पिपाडा हे राधाकृष्ण विखे-पाटील यांचे कट्टर वैरी आहेत. हेही पूर्वी भाजपात व नंतर शिवसेनेत होते. राधाकृष्ण विखे-पाटलांच्या विरोधात ते शिवसेनेचे उमेदवार होते. मात्र ते थोड्या मतांनी हरले नंतर ते राष्ट्रवादीत आले व साई संस्थानाचे विश्वस्त होऊन बसले.

सुरेंद्र खर्डे हे राष्ट्रवादीचे स्थानिक नेते आहेत. ते अजित पवारांचे खास समजले जातात. साई संस्थान न्यासाचे आणखी एक विश्वस्त अजित कदम हे तर उपमुख्यमंत्री अजित पवारांचे सख्खे मामेभाऊ, मग काय विचारायलाच नको. राष्ट्रवादीचे आणखी एक विश्वस्त मिलनाथ पांडे हे राष्ट्रवादीचे अध्यक्ष मधुकर पिचड यांचे खास चेले आहेत. त्यामुळे त्यांची या विश्वस्तपदावर वर्णी लागली.

### काँग्रेसची टीम

साई संस्थानाचे काँग्रेसचे विश्वस्त राधाकृष्ण विखे-पाटील हे तर शिर्डीचे राजाच. त्यांनी ५०० कोटींचे नुकसान करून मुळा-प्रवरा विद्युत सोसायटी बुडविली. काही साखर कारखानेही बुडविले, असा त्यांच्यावर आरोप आहे. तरीही त्यांचे 'सहकार साम्राज्य' आबाद आहे. त्यांना विश्वस्त न करणे म्हणजे साक्षात राजकीय भूकंपच होईल. म्हणून त्यांना कुणी हात लावित नाही. संस्थानाच्या दुसऱ्या विश्वस्त स्नेहलता कोल्हे या सहकार सम्राट शंकरराव कोल्हे यांच्या सूनबाई. त्या हिरकणी बचत गट चालवितात त्यांची दूध संस्थांही आहे. विलास कोते हे विश्वस्त राधाकृष्ण विखे-पाटलांचे खासम्खास आहेत. म्हणून त्यांची वर्णी लागली. शिर्डीच्या काँग्रेसच्या नगराध्यक्षा सुमित्रा कोते या न्यासाच्या पदसिद्ध विश्वस्त आहेत. त्या विखे-पाटलांच्या खास विश्वासातील आहेत. प्रकाश नांदुरकर हे विश्वस्त माणिकराव ठाकरे यांचा खास माणूस आहे. तर, नामदेव गुंजाळ हे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचे विश्वासातील कार्यकर्ते आहेत.

वर सांगितलेले सर्व विश्वस्त राजकारणी आहेत. मात्र डॉक्टर शैलेश कुटे हे राजकारणापेक्षा स्वामी बाबा रामदेव यांच्या चरणी लागलेले आहेत. बाबा रामदेव यांची नाशिक-नगर मधील योगशिबिरे तेच भरवितात. मात्र ते राष्ट्रवादीचे नेते गोविंदराव आदिक यांचे खासम्खास आहेत. म्हणून त्यांची विश्वस्तपदावर वर्णी लागली. दुसरे एक विश्वस्त पतंगराव शेळके हे राष्ट्रवादीच्या कोट्यातून विश्वस्त झालेले असले तरी ते माजी क्रिकेटपटू आहेत. राज्यस्तरावर अनेक सामने ते खेळले आहेत.

## चेंदवणकरांच्या घरावर हल्ला करणारे ८ जणांचे टोळके गजाआड

सिंधुदुर्ग, ता.२९- ओझर (मालवण) येथील दिलीप चेंदवणकर यांच्या घरावर हल्ला करणाऱ्या टोळक्यांतील आठजणांना जेरबंद करण्यास मालवण पोलिसांना यश आले असून एक महिला व काही संशयित फरार असून, करण्यात आलेल्यामध्ये शिवप्रसाद चेंदवणकर (२७), प्रभाकर पाटील (२५), मुरलीधर लेणे (२७), संतोष सुर्वे (२७), तुषार पांचाळ (२३), सचिन राणे (२९), आशा फर्नांडिस (६०) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी दोन रिक्षासह एक दुचाकी जप्त केली आहे. १२ ते १५ जणांच्या टोळक्यांनी दिलीप चेंदवणकर यांच्या घरात जबरदस्ती प्रवेश करून त्यांचे सामान घराबाहेर फेकून पत्नी दिपाली, भाची रेश्मा कवटकर यांना मारहाण केली होती. हा प्रकार जमिनीसह घराच्या सामायिक हिश्श्याच्या वादातून घडला असून मालवण पोलिसांनी अवघ्या दहा तासांत संशयितांना अटक केल्याबद्दल पोलिसांचे अभिनंदन होत आहे.

## इडियट बॉक्स केवळ मनोरंजनाचेच नव्हे तर शिक्षणाचे साधन झाले! टाटा स्कायची किमया

देशभरातील अनेक आघाडीच्या शाळा आपल्याकडे दिले जाणारे शिक्षण मनोरंजक करत आहेत. आता टाटा स्काय देशातल्या ८५० शाळांमध्ये पोहोचले असून त्याद्वारे मनोरंजनातून शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. टाटा स्कायच्या ॲक्टीव्ह फिचरमध्ये एकमेवाद्वितीय अशा तीन इंटरॅक्टिव्ह सेवा, ॲक्टिव्ह विझकिड्स, ॲक्टिव्ह स्टोरीज आणि ॲक्टिव्ह लर्निंग देऊ केल्या आहेत.



शाळा बाजूला राहू द्या, पण १० लाखांपेक्षा जास्त घरांमध्ये या व्हॅल्यू ॲडेड सेवांचा उपयोग केला जात आहे. सध्या ते या सेवांसाठी महिन्याला ३० रुपयांपेक्षा जास्त रक्कम मोजत आहेत. गेम्समध्ये कोणतीही रक्तरंजित कृती, उन्माद किंवा शिवराळ भाषेचा वापर नसेल, याची काळजी घेण्यात आली आहे. याशिवाय तुमचा टीव्ही हा संगणकाप्रमाणे काम करून तुम्हाला मल्टिपल चॉईस प्रश्न विचारतो. तुमच्या उत्तरांवर आधारीत असलेले प्रगतीपुस्तक सादर करतो. यासाठी वेगळा नवा रिमोट किंवा बॉक्स किंवा टीव्हीची गरज नाही. मुलांच्या घरांमध्ये सुरू असलेल्या शिक्षण प्रक्रियेला आकर्षक गेम्सच्या माध्यमातून हातभार लागावा यासाठी ॲक्टिव्ह विझकिड्स ही शैक्षणिक, तरीही मनोरंजक सेवा आहे. ॲनिमेशन जगातील प्रसिध्द पात्र तुमचे सामान्य ज्ञान, गणित, लॉजिक, इंग्रजी यावर बेतलेले प्रश्न विचारतात आणि मुले टाटा स्काय रिमोटच्या मदतीने त्यांची उत्तरे देऊ शकतात.

याच पद्धतीने ॲक्टिव्ह लर्निंग ही सेवा ७ ते १२ वयोगटांतील मुलांसाठी असून यात शालेय अभ्यासक्रमाशी साधर्म्य असलेले विज्ञान, गणित आणि सामान्य ज्ञानावर आधारीत इंटरेक्टिव्ह क्वीझ यांचा समावेश आहे. त्यामुळे मुलांच्या ज्ञानवर्धनाबरोबरच त्यांची स्पर्धात्मक परीक्षांची तयारीही होते. याही पुढे जात मुलांना पंचतंत्र, जातक कथा, हितोपदेश आणि भारतीय पौराणिक कथा इंग्रजी, हिंदी, मराठी, तामिळ, तेलगू आणि बंगाली या भाषांत वाचता किंवा ऐकता येतात.

मुलांना आपल्या सोयीनुसार या गोष्टींच्या कार्यक्रमाची वेळ ठरवता येते. त्यामुळे टेलिव्हिजनच्या वेळेचे बंधन राहात नाही. उदाहरणार्थ, पंचतंत्र कथांचे दुपारी २.४५ वाजता वेळ ठरविता येते.

पूर्वीच्या काळी टीव्हीवर असलेला हिंसाचार, लैंगिकता आणि मुलांच्या मानसिकतेवर आघात करणाऱ्या अन्य प्रकारांमुळे त्यांना टेलिव्हिजन पाहण्यापासून रोखलं जायचं. पण आता मात्र टाटा स्काय सॅटेलाईट टेलिव्हिजनसारख्या सेवांमुळे मुले मनोरंजन आणि ज्ञानवर्धनासाठी टेलिव्हिजनचा उपयोग करतील, याची हमी बाळगता येते.

सुरुवातीला, या सेवांवर पालकांचं निमत्रण दिल्यामुळे आपल्या मुलांनी टीव्हीवर काय बघावे, याचे नियंत्रण पालकांच्या हाती देण्यात आले आहे. तात्पर्य म्हणजे टेलिव्हिजन हे प्रसारमाध्यम आजही संगणकापेक्षा अधिक खोलवर रुजलेले आहे. अगदी संगणक असलेल्या घरांमध्येही या सेवांमुळे वारंवार गेम्सच्या सीडी खरेदी करण्यावर होणारा खर्च या सेवांमुळे वाचणार आहे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाची ही नवी पद्धत अधिकाधिक ख्बख्त होत आहे. आता आपल्याला सहज शक्य असलेल्या या सेवा स्वीकारून आपल्या मुलांचे भाषा आणि संभाषण कौशल्य वाढवायचे का, याचा निर्णय पालकांनी घ्यायचा आहे.

## सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयाला संतप्त गावकऱ्यांनी टाळे ठोकले

रत्नागिरी,ता.२९- गुहागर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पर्यटन विकासांतर्गत आलेला निधी तसेच पालकमंत्र्यांनी शहराच्या पर्यटनासाठी दिलेल्या निधीतून कोणकोणती कामे सुरू आहेत, अथवा झाली याबाबत ग्रामसभेत ग्रामस्थ विचारणा करतात. मात्र या ग्रामसभेला सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारीच उपस्थित राहात नसल्याने गुहागरातील संतप्त ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयाला कुलूप ठोकले. पालकमंत्री भास्कर जाधव यांनी शहराच्या पर्यटनात्मक विकासासाठी मोठ्याप्रमाणात निधी दिला आहे. या निधीतील बहुतांशी कामे ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वतीने सुरू आहेत. त्यातच शहरातील जुने वृक्ष तोडण्याबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याने गतवर्षी आश्वासन दिले हाते.

त्याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात या विभागाकडून बसवण्यात आलेल्या सौरदीपच्या दुरुस्तीचे नियोजन नाही. तसेच अन्य विकासकामाची माहिती मागितली तरी माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याने गुहागर ग्रामपंचायतीने ग्रामसभेसाठी येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांना निमंत्रण दिले होते. मात्र गतवेळच्या ग्रामसभेला अधिकारी येत नसतील तर त्यांच्या कार्यालयाला टाळे ठोकण्याचा ठराव या ग्रामसभेत करण्यात आला होता. त्याप्रमाणे मंगळवारी सरपंच सदस्य व ग्रामस्थ सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात याची विचारणा करण्यास गेले असता त्यांना तेथे कोणीही आढळले नाही. प्रत्येकवेळी असेच होत असल्याने शेवटी संतापून ग्रामस्थांनीच सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयाला टाळे ठोकून चावी गुहागर पोलीस स्थानक व तहसील कार्यालयात जमा केली आहे. यावेळी सरपंच सतीश शेट्ये. ग्रामपंचायत सदस्य निलेश मोरे, प्रकाश रहाटे, शाम आठवले इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.




आशुतोष राणा म्हणजे भारदस्त आवाज. हिंदी भाषेवर जबरदस्त प्रभुत्व आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भूमिकेवरची निष्ठा. या साऱ्या गोष्टी जुळवून आणल्या की भारतीय रंगभूमी अशा कलाकाराची प्रतिक्षा करायला लागते. 'रामलीला' या नौटंकीमध्ये रावण साकार केल्यानंतर पं.श्रीदेव भास्करशास्त्री या रावणावर इतके प्रभावीत झाले की त्यांनी एका रात्री निर्णय घेऊन मध्यप्रदेशमधल्या या सर्जनशील कलाकाराला दिल्लीतल्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये जाण्यास भाग पाडले.रामलीला ही लोककला आहे. पण त्याहीपलीकडे नाटकाचे स्वतःचे असे शास्त्र आहे. ते आशुतोषने जाणले. एन.एस.डी.मध्ये पदवी संपादन केल्यानंतर आशुतोष मुंबईमध्ये दाखल झाला. मुळातच गुणी असल्यामुळे संघर्ष, दुष्मन या चित्रपटातल्या भूमिका साकार करणे त्याच्यासाठी अवघड नव्हते. यामुळेच अभ्यासू आणि जिज्ञासू अभिनेता म्हणून आशुतोषवर प्रभाव पडला.'कौन बनेगा करोडपती'मधून अमिताभ बच्चन सहज, उत्स्फूर्त, उच्च भाषाशैलीचा वापर करून प्रेक्षकांना आकर्षित करतोय म्हणताना 'बाजी किसकी'या स्पर्धात्मक मालिकेसाठी तेवढ्याच ताकदीचा सूत्रसंचालक हवा हा विचार आला त्यावेळी आशुतोषचे नाव पुढे आले. अलीकडे मराठी सोहळ्यात आशुतोष छान रमण्यामागचे कारण म्हणजे रेणूका शहाणेला त्याने पत्नी म्हणून स्वीकारलेले आहे. रेणूच्या 'रिटा'या चित्रपटामध्ये जॅकी श्रॉफ ऐवजी आशुतोष दिसायला हवा होता. आता त्याने मराठी माध्यम पूर्णपणे आत्मसात केलेले आहे. त्याबळावरच किशोर पांडुरंग बेळेकर दिग्दर्शित 'येडा आप्पा'या मराठी चित्रपटामध्ये मानसिकदृष्ट्या अपंग असलेली व्यक्ती याची तो भूमिका साकार करतो आहे. या निर्मिती प्रक्रियेमध्ये गिरीश साळवी हाही अभिनेता आहे.

## माणच्या जमिनीवरील पुनर्वसनाचा शिक्का रद्द करण्याचा निर्णय

सातारा, ता.२९- दुष्काळी जनतेसाठी भगीरथ ठरणाऱ्या जिहे-कटापूर योजनेसाठी माण-खटाव तालुक्यातील भूमिपुत्रांच्या जमिनी संपादित केल्या. पुनर्वसनाचा प्रश्न सुटला नाही पण, त्यांच्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर 'पुनर्वसनाचा' शिक्का बसला. अखेर अठरा वर्षांनी हा शिक्का रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे दुष्काळी जनतेला थोडा-फार दिलासा मिळाला आहे.

माण तालुक्यातील जिहे-कटापूर योजनेअंतर्गत ज्या जमिनीवर पुनर्वसनाचा शिक्का बसला आहे तो शासन आदेशानेच रद्द करण्याचा निर्णय मुख्यमंत्री व साताराचे सुपुत्र पृथ्वीराज चव्हाण यांनी घेतला आहे. माणवासीयांचा ७/१२ कोरा झाला असला तरी कोरड्या विहिरी व तलाव, शेततळ्यात पाणी आणण्यासाठी लोकप्रतिनिधी कमी पडल्याचे सिद्ध झाले आहे. आता माण-खटाव, फलटण, कोरेगांव, खंडाळा तालुक्यांतील दुष्काळी जनतेला निसर्गावर अवलंबून राहावे लागणार आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात सातारा जिल्ह्यातील रखडलेल्या महू-हातगेघर, डरमोडी, तारठी, वांग-मराठवाडी, कोयना पुनर्वसन व इतर प्रकल्पासाठी भरीव निधीची तरतूद न केल्याने पुनर्वसनाचाही प्रश्न रखडला आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी हा अर्थसंकल्प म्हणजे 'दुष्काळी अर्थसंकल्प' अशा शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, माणवासीयांच्या माथ्यावरील पुनर्वसनाचा शिक्का रद्द झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## अलिबागमधील वावे गावात भव्य श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा

अलिबाग, ता.२९- सालाबादप्रमाणे मु. वावे, ता. अलिबाग, जिल्हा -रायगड येथे चैत्र शु. ९ रविवार १ एप्रिल २०१२ रोजी मंदिराच्या नूतन मनमोहक वास्तूत ६३व्या श्रीराम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वा. श्रीराम प्रासादिक भजन मंडळ वावे. बुबा- बळीराम गावंड, वादनकार- दमोदर गावंड, हरिश्चंद्र गावंड, जनार्दन गावंड, यांचे सुश्राव्य भजन होणार आहे. श्रीराम नवमी दिवशी दुपारी १२.३० वा. मर्यादापुरुषोत्तम श्रीराम प्रभूंच्या जन्मोत्सवाचा सोहळा संपन्न होणार आहे.

भक्तजनांच्या मनोरंजनार्थ पंचक्रोशीतील ७ भजनी मंडळांचे कार्यक्रम दुपारी १ ते रात्री ९ पर्यंत, व रात्री ९.०० वा. विविध सजावटीचे सजविलेला श्रीराम रथ चालवीत पालखी सोहळा, सोबत लेझीम पथक, बेन्जो पथक, लाठी काठी, डिजे अशी भव्य मिरवणूक गावातून काढण्यात येणार आहे. पालखीसोबत टाळ-मृदुंगधारी वारकरी भजन, भावगीते, पारंपरिक वेषभूषाधारक भाविक ग्रामस्थ हे श्रीराम प्रभूंच्या पालखीचे प्रमुख आकर्षण आहे.

श्रीराम प्रभूंच्या भक्तीमय आनंद जन्मोत्सव सोहळ्याचा व तिर्थ प्रसदाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा व या भक्तीमय सोहळ्यात सहभागी होऊन या सोहळ्याचा आनंद आपण सर्वांनी द्विगुणीत करावा, असे आवाहन दिनेश हरिश्चंद्र तुरे यांनी केले आहे. भक्तजनांच्या मनोरंजनार्थ मंगळवार ३ एप्रिल २०१२ रोजी रात्री १०.०० वा. दशरथ राणे लिखित 'गृहलक्ष्मी' या सामाजिक तीन अंकी नाटकाचा प्रयोग होणार आहे.

**महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,**
'आयएस्ओ ९००१ : २००८ नामांकित संस्था'
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे -४११ ००७**
**websit: www.mcaer.org**
**e_mail: edn_mcaer@rediffmail.com** दूरध्वनी ०२०-२५५३७६८८

**कृषी व संलग्न पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये कायमस्वरुपी विना अनुदान तत्त्वावर सुरू करण्याकरिता अर्ज विक्री**

राज्य शासनाच्या धोरणानुसार कृषी व संलग्न विद्याशाखेत पदवी अभ्यासक्रमाची कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर विशिष्ट जिल्ह्यांमध्ये महाविद्यालये सुरू करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज व माहिती पुस्तिका **दि. २/४/२०१२ ते दि. ७/४/२०१२** पर्यंत खालील पत्त्यावर उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११००७
दूरध्वनी क्र. ०२०-२५५३७६८८

विहित अर्ज व माहिती पुस्तिकेचे शुल्क रु.१०००/-(अक्षरी रुपये एक हजार फक्त) असे असून मागणीपत्रानुसार रोखीने अथवा धनाकर्षाद्वारे अर्ज व माहिती पुस्तिका प्राप्त करून घेता येतील. धनाकर्षाद्वारे रक्कम अदा करावयाची असल्यास 'वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे या नावे स्टेट बँक ऑफ इंडिया, विद्यापीठ रोड शाखा, पुणे (सांकेतांक क्रमांक ७३३९)' येथे धनाकर्ष देय असावे.

कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर महाविद्यालये सुरू करण्यासाठीचा जिल्हानिहाय तपशिल व इतर सविस्तर माहिती www.mcaer.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

परीपूर्ण भरलेले अर्ज व सविस्तर प्रस्ताव, प्रक्रिया शुल्कासह स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ३०/४/२०१२ आहे.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/६३११/६६६/२०१२
दिनांक: २६ मार्च, २०१२
स्थळ: पुणे डीजीआयपीआर/२०११-२०१२/४१०३

**सही/-**
**एम.एच.सावंत**
**महासंचालक**

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ अग्रलेखांचा बादशहा

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

# सरकार आणि लष्करप्रमुखांमधला बेबनाव

काही दिवसांपूर्वीच आम्ही या देशाचा कारभार रामभरोसे चालला आहे, असा उल्लेख केला होता. आज तशीच परिस्थिती पहायला मिळते. लष्करप्रमुख व्ही. के. सिंग यांनी पंतप्रधानांना पत्र पाठवून देशाची सुरक्षा व्यवस्था धोक्यात असल्याचा इशारा दिला होता. हे गोपनीय पत्र फुटल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवला गेला. आता त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याची शक्यता व्यक्त होत आहे. याच लष्करप्रमुखांनी दोन दिवसापूर्वी काही रणगाड्यांची खरेदी करण्याकरिता आपल्याला तब्बल चौदा कोटी रुपयांची लाच देण्याचा प्रयत्न झाला होता असाही गौप्यस्फोट केला. संरक्षणमंत्री ए. के. अँटोनी यांनी अशाप्रकारच्या लाचखोरीची पूर्वकल्पना आपल्याला दिल्याचे मान्य केले. आणि आता तर थेट पंतप्रधानांच्या कार्यालयात पोहोचलेले लष्करप्रमुखांचे पत्र फुटल्यामुळे एकूणच देशाच्या सुरक्षाव्यवस्थेला नुसतेच तडे नाही, तर अनेक भगदाडे पडल्याचे सिद्ध होते. त्या सगळ्या आरोप- प्रत्यारोपांमध्ये किती तथ्य आहे आणि किती सत्य आहे, हा भाग वादाचा जरी असला तरीसुध्दा एकूण देशात जे काही चालू आहे ती परिस्थिती गंभीर स्वरूपाची ठरते. भ्रष्टाचारात आणि घोटाळ्यांमध्ये आकंठ बुडालेले सरकार आणि त्याच भ्रष्टाचाराच्या जोरावर लष्करालाही भ्रष्ट ठरवण्याचा प्रयत्न या सगळ्या गोष्टी अत्यंत धोकादायक म्हणाव्या लागतील. कोणाचाही, कोणामध्ये पायपोस राहिलेला दिसत नाही. सरकारचे वेगवेगळ्या सरकारी यंत्रणांवर जे नियंत्रण असायला हवे ते उरलेले नाही. कारण सरकारचीच प्रतिमा डागाळली गेली असल्याने या यंत्रणादेखील सरकारला कवडीची किंमत द्यायला तयार नाहीत. लष्करप्रमुखासारख्या अत्यंत महत्त्वाच्या पदावरची व्यक्ती अनेक महत्त्वपूर्ण मुद्दांविषयी जाहीर चर्चा करते. किंवा अशा लष्करप्रमुखाचे पत्र प्रसारमाध्यमांच्या हाती लागते, यावरून कोण, कोणाचे संरक्षण करते आहे आणि कोण, कोणाचा भ्रष्टाचार पोसते आहे याच्यावरही प्रकाश पडतो. एकूणच देशाचा कारभार हा एका गंभीर वळणावर येऊन पोहोचल्याचे हे फार मोठे निदर्शक आहे. या सुंदोपसुंदीचा किंवा सरकारविरुध्द लष्करप्रमुख अशा भांडणाचा शत्रूराष्टे - केव्हाही आणि कसाही गैरफायदा घेऊ शकतात.

### लष्कर प्रमुखांचे नैराश्य

विशेषत: गेल्या सहा महिन्यांपासून व्ही. के. सिंग हे वादग्रस्त व्यक्तिमत्त्व ठरत आहे. त्यांनी केलेल्या वक्तव्यांवर किती विश्वास ठेवायचा हाही एक मोठा प्रश्नच म्हणावा लागेल.सिंग हे मे महिन्यामध्ये निवृत्त होत आहेत. परंतु त्यांनी आपल्या निवृत्तीसाठी आणखी एक वर्ष मिळावे म्हणून तसा जन्मदाखलाही सादर केला आहे. परंतु हे सगळे उशिरा सुचलेले शहाणपण असल्यामुळे त्याच्यावर इतक्या उशिरा उपाययोजना करता येत नाहीत. सरकारने त्यांची ही विनंती फेटाळली. सिंग यांना या मे महिन्यातच निवृत्त व्हावे लागेल. कदाचित सरकारविरुद्धचा राग त्यांच्या मनामध्ये असू शकेल. किंवा निराशेपोटी त्यांची काही प्रमाणात आदळआपट सुरू असण्याची शक्यता आहे. त्यातूनच त्यांनी दोन वर्षांपूर्वी दिली गेलेली १४ कोटींची लाचखोरीची ऑफर आता उघड केली. किंवा देशाच्या लष्कराची अवस्था आणि सुरक्षाव्यवस्था समाधानकारक नसल्याचा साक्षात्कार निवृत्त होता-होता झालेला असावा. त्यांच्या या पंतप्रधानांना लिहिलेल्या ताज्या पत्रावरून एका फार मोठ्या राष्ट्रीय मुद्याला तोंड फुटले आहे. कारण थेट सरकार आणि लष्कर यांच्यात कारभाराविषयी गंभीर मुद्दे उपस्थित झाले आहेत. थोडक्यात सांगायचे तर सरकार आणि लष्करप्रमुख यांच्यात कोणताही सुसंवाद दिसत नाही. त्याची सरकारला आणि लष्करप्रमुखांना आवश्यकता वाटलेली दिसत नाही. आपले पद टिकावे आपल्याला आणखी एक वर्ष मिळावे एवढ्याच चिंतेने व्ही. के. सिंग व्याकुळ झालेले होते. त्यांचा हा स्वार्थही जेव्हा धुडकावला गेला त्यावेळेला देशाच्या सुरक्षिततेची त्यांना चिंता वाटू लागल्याचे धडधडीतपणे दिसते. परंतु अशाप्रकारचे मतभेद जरी असले तरी एकूण तीनही दलांचे प्रमुख आणि सरकार यांच्यामध्ये सुसंवाद असणे अत्यंत गरजेचे आहे ते ठेवण्याचे कौशल्य संरक्षणमंत्री आणि पंतप्रधानांनी दाखवायचे असते. सुसंवाद असा त्याचा अर्थ नाही तर या तीनही दलांच्या प्रमुखांवर तितकेच नियंत्रणही गरजेचे असते. ठिकठिकाणच्या कार्यक्रमांमध्ये केवळ सॅल्यूट स्वीकारण्यासाठी संरक्षण मंत्री नसतात. तर तीनही दलांच्या कार्यालयांमध्ये काय परिस्थिती आहे, कोण कोणाचे पाय ओढतो आहे इथपासून ते तीनही दलांकडून देशाच्या सुरक्षिततेचे कठोर पालन होत आहे की नाही अशा महत्त्वाच्या गोष्टींपर्यंत संरक्षण मंत्र्यांना लक्ष ठेवावे लागते. दुर्दैवाने गेल्या दहा-बारा वर्षांत तीनही दलांचे प्रमुख आणि सरकार यांच्यात काही ना काही कारणांवरुन खटके उडालेले दिसून येतात. १९९८ ला हवाई दल प्रमुख विष्णू भागवतांची झालेली बडतर्फी किंवा आताच्या लष्कर प्रमुखांबरोबर उडालेला खटका कारगिल युध्दाच्या वेळी लष्करातल्या एका प्रमुख व्यक्तीने गोपनीय कागदपत्र उघड केली होती. यावरून लष्करातल्या कार्यपध्दतीमध्ये बराच स्वैराचार घुसल्याचे दिसून येते.

### सुरक्षेची पत्रास राहिलेली नाही

व्ही. के. सिंग यांनी पंतप्रधानांना पाठवलेले पत्र अतिशय गंभीरतेने घेतले पाहिजे. हे पत्र प्रसारमाध्यमापर्यंत कसे पोहोचले. याचा शोध तर घेतला गेलाच पाहिजे.परंतु त्या पत्रात त्यांनी मांडलेले मुद्देदेखील तितक्याच गंभीरतेने विचारात घ्यावे लागतील. कारण लष्करप्रमुखाचे पत्र अशाप्रकारे बाहेर फुटत असेल तर मग एकूणच तीनही दलांमधली गोपनीय माहिती सहजपणे बाहेर पडत असावी, अशा शंकेला पाठबळ मिळते.जिथे लष्करप्रमुखांचा पत्रव्यवहारच सुरक्षित नाही तिथे देशाचा संरक्षण व्यवहार काय ताकदीचा राहिलेला असेल याचीदेखील कल्पना येते. लष्करप्रमुखांनी पंतप्रधानांना पत्र पाठवणे किंवा ते पत्र फुटणे या सगळ्या गोष्टी म्हणजे आपल्या सुरक्षा व्यवस्थेची पत्रास राहिलेली नाही. हेच सांगणारे आहे. सुरक्षेचे असे तीन तेरा वाजत आहेत. या सगळ्या प्रकाराची अतिशय गंभीरतेने चौकशी होणे गरजेचे ठरते.

## मुखशुद्धी

एका चौकात गौतम आणि अमित दोघे उभे असतात. तेव्हा त्यावेळचा हा प्रसंग:

**गौतम** - एक रिक्षावाला या समोरच्या नो एन्ट्रीमध्ये घुसतो तरी त्याला ट्रॉफिक पोलीस अडवत नाही. का सांग?

**अमित**- का?

**गौतम**- सोप्प आहे! कारण तो पायी चालत असतो.

## पंचांग

**शुक्रवार, ३० मार्च २०१२**

शके १९३४ नंदननामसंवत्सर,

✻ चैत्र शुक्ल सप्तमी ● **नक्षत्र:** आर्द्रा

● रवी उदय ०६-३६, रवी अस्त १८-५१

**जन्मराशी:** ००-०१ ते २४-०० मिथुन

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालक: **सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**

मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोन : २३८८०९८१,

जाहिरात विभाग: २३८६०९८७,२३८४१५२४, फॅक्स नं.: २३८१०१७६

वितरण: २३८२४४६६, फॅक्स नं. : २३८६ ०९८९, २३८७ ४९११.

**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**

info@navakal.org

http://navakal.org

'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७

स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

## कविता: पाणी अडवा, पाणी जिरवा

पाणी आडवा पाणी जिरवा, पाणी हेच जीवन सजीवा
समजून घे रे मानवा...
डोंगरमाळावरती पाणी अडवूया
भूमीमध्ये पाणी जिरवूया
भूजलाचा साठा वाढवूया
वृक्ष लागवड आपण करुया, नका लावू वणवा,
समजून घेरे मानवा... ।।१।।

नदी-नाल्यांचे रक्षण करुया
सांडपाण्याची विल्हेवाट लावूया
पाण्याचा अपव्यय टाळूया
हवे तेवढेच पाणी वापरुया
थेंब-थेंब पाण्याचा, आहे सोन्याचा, मनी साऱ्यांच्या रुजवा
समजून घे रे मानवा... ।।२।।

पाण्यापुढे सारे समान
उच्च-नीच ना, ना कोणी महान
तहानलेल्यांची भागवा तहान
मानवतेचा हा संदेश महान
'या बसा पाणी प्या', 'या बसा पाणी प्या'
असे संस्कार आपले बनवा, समजून घे रे मानवा ।।३।।

सर्व जीवांचे पाणी वरदान
पाण्यामुळे मिळते जीवदान
पाण्यामध्ये टाकू नका घाण
पाणी रक्षणा शिकूया ज्ञान
'पाणी वाचवा, जीवन बचवा' जग संपन्न बनवा,
समजून घे रे मानवा. ।।४।।

**- निलेश अनाजी शेलार**
मु.रेणोशी, पो.गावढोशी,
ता.महाबळेश्वर, जि.सातारा.**मोबा.**: ७५८८२ १४१ ७१

# क्रीडा



# राष्ट्रीय मल्लखांबः महाराष्ट्राचेच वर्चस्व



पुणे, ता.२९- येथील सणस मैदानात नुकत्याच पुणे जिल्हा मल्लखांब संघटना आणि महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या २९व्या राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत आणि दुसऱ्या पुणे महापौर चषक मल्लखांब स्पर्धेत अपेक्षेप्रमाणे यजमान महाराष्ट्राचेच वर्चस्व राहिले. पुरुषांच्या गटात ४ पैकी ३ मध्ये महाराष्ट्रानेच अव्वल क्रमांक मिळविला. तर महिलांच्या चारही गटाची विजेतेपदे महाराष्ट्रालाच मिळाली.

पुरुष गटांत शशिकांत म्हसकर आणि महिला गटांत साहिली धुरीने प्रथम क्रमांक पटकावला. १६ राज्यांतील ४०० पेक्षा जास्त खेळाडू सहभागी झाले होते. मुलांच्या १२ वर्षांखालील गटांत तामिळनाडूच्या एस. मनोजने वैयक्तिक सुवर्णपदक जिंकले. तर व्ही विजयनरसिंहने रौप्यपदक पटकावून तामिळनाडूला सांघिक सुवर्णपदक जिंकून दिले.

पुण्याच्या महापौर वैशाली बनकर यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. तर पुणे महापालिकेच्या क्रीडा समितीच्या अध्यक्षा नंदा लोणकर आणि भाजपा नगरसेविका मुक्ता टिळक यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. सांघिक विजेत्या संघांना प्रत्येकी ३० हजार रुपये आणि वैयक्तिक विजेत्यांना प्रत्येकी २० हजार रुपये अशी १ लाखाची पारितोषिके देण्यात आली.

सुवर्णपदक विजेते खेळाडूः मुले १२ वर्षांखालील (सांघिक तामिळनाडू), १४ वर्षांखालील महाराष्ट्रः १८ वर्षांखालील महाराष्ट्र, १८ वर्षांवरील महाराष्ट्र, वैयक्तिक विजेतेः एस.मनोज (तामिळनाडू), शक्ती शेखर, सागर ओव्हाळकर, शशिधर म्हसकर सर्व (महाराष्ट्र). महिलाः १२ वर्षांखालील महाराष्ट्र, १४ वर्षांखाली महाराष्ट्र, १६ वर्षांखाली महाराष्ट्र आणि १६ वर्षांवरील महाराष्ट्र. वैयक्तिक विजेतेः एस.साक्षी वामन (महाराष्ट्र), सुखदा पडते, वर्षा मोरे आणि साईली धुरी (महाराष्ट्र).

## मायकल क्लार्क पुणे संघातर्फे खेळणार



पुणे, ता.२९- ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा कर्णधार मायकल क्लार्क ५व्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेत पुणे वॉरीअर्स संघातर्फे खेळणार आहे. सध्या आजारी असलेल्या युवराज सिंगची तो जागा घेईल. बीसीसीआयने क्लार्कच्या निवडीला हिरवा कंदील दर्शविला आहे. सौरव गांगुली या संघाचे नेतृत्व करणार आहे. क्लार्कच्या समावेशामुळे आमच्या संघाची फलंदाजी अधिक मजबूत होईल, असे गांगुली यांनी सांगितले. सध्या वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर मायकल क्लार्क असून तो दौरा २७ एप्रिलला संपणार आहे. त्यानंतर क्लार्क पुणे संघात दाखल होईल.

## कॅलिस भारताविरुध्द खेळणार

जोहान्सबर्ग, ता.२९- साऊथ आफ्रिकेचा स्टार अष्टपैलू खेळाडू जॅक कॅलिस भारताविरुध्द येथे होणाऱ्या टी-२० सामन्यात खेळणार आहे. जॅक कॅलिस आता दुखापतीतून सावरला असून तो या सामन्यासाठी उपलब्ध असल्याचे दक्षिण आफ्रिकन संघाचे व्यवस्थापक मोहम्मद मुसुजी यांनी सांगितले. ३६ वर्षीय कॅलिसला दुखापत झाल्यामुळे तो न्यूझीलंडविरुध्द शेवटच्या सामन्यात खेळला नव्हता. आता मात्र तो या दुःखापतीतून सावरला असल्यामुळे भारताविरुध्दच्या लढतीसाठी तो सज्ज असल्याचे व्यवस्थापक म्हणाले. दक्षिण आफ्रिकेचा संघ या सामन्यासाठी आपल्या बहुतेक ज्येष्ठ खेळाडूंना विश्रांती देणार आहे. कॅलिसवर त्यामुळे दक्षिण आफ्रिकेची मोठी मदार राहील.

भारतीय नागरिकाला दक्षिण आफ्रिकेत जाऊन १५० वर्षे पूर्ण झाल्यामुळे भारत-दक्षिण आफ्रिका संघात या एकमेव टी-२० सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. धोनीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ येथे काल दाखल झाला. या सामन्यात आम्ही चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करू, असेही धोनीने सांगितले. ऑस्ट्रेलियन दौऱ्यातील आणि एशिया स्पर्धेतील खराब कामगिरीनंतर या सामन्यात मात्र आम्ही जिंकण्यासाठीच प्रयत्न करू, असेही तो म्हणाला. झहीर खान, विरेंद्र सेहवाग या दोघांना मात्र विश्रांती देण्यात आली. पूर्ण ताकदीनिशी भारतीय संघ या सामन्यात उतरत असल्यामुळे कागदावर भारतीय संघाचेच पारडे जड आहे.

## भारत पेट्रोलियम संघाची शानदार हॅट्ट्रीक

मुंबई, गुरुवार- कन्नमवारनगरातील संभाजी राजे मैदानात आयोजित करण्यात आलेल्या मुंबई महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत बलाढ्य भारत पेट्रोलियम संघाने सलग तिसरे विजेतेपद मिळवून शानदार हॅट्ट्रीक साधली. निर्णायक लढतीत चुरशीच्या सामन्यात भारत पेट्रोलियमने एअर इंडियावर २२-२० गुणांनी निसटता विजय मिळविला. विश्रांतीला १४-८ गुणांची आघाडी एअर इंडियाकडे होती. परंतु विश्रांतीनंतर भारत पेट्रोलियमच्या रिषांक देवाडिगाने एकाच चढाईत तीन गडी बाद करून सामना आपल्या संघाच्या बाजूने झुकवला. तिथेच सामन्याला मोठी कलाटणी मिळाली.

रिषांकने जेव्हा तीन खेळाडूंना बाद केले तेव्हा एअर इंडियाच्या खेळाडूंनी पंचाच्या या निर्णयाविरुध्द चांगलाच हंगामा केला. त्यावेळी काही काळ सामन्यात तणाव निर्माण झाला होता. परंतु मग एअर इंडियाच्या प्रशिक्षकांनी पंचांचा निर्णय खिलाडू वृत्तीने मान्य करत आपल्या खेळाडूंना समजावीत सामना पुढे सुरू करण्यास परवानगी दिली.

एअर इंडियाच्या पंकज ठाकूरने एकाच चढाईत तीन गडी बाद केले. तर दीपक झझोटनेदेखील शानदार खेळ केला. रिषांक देवाडिगाला विकास काळेने सफाईदार पकडी करून छान साथ दिली. विजेत्या संघाला ३३ हजार रुपये रोख आणि आकर्षक चषक भेट देण्यात आला. तर उपविजेत्या संघाला २२ हजार रुपये रोख आणि चषक देऊन गौरविण्यात आले. मुंबईचे महापौर सुनिल प्रभू , आमदार प्रताप सरनाईक आणि बेस्ट समितीचे अध्यक्ष अशोक पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचा बक्षीस समारंभ पार पडला. यावेळी विश्वचषक विजेत्या भारतीय महिला कबड्डी संघात असलेल्या सुवर्णा बारटक्केचा महापौरांच्या हस्ते २५,००० रुपये रोख देऊन खास सन्मान करण्यात आला. तसेच स्थानिक युवा फुटबॉलपटू हर्षल कांबळे याचाही विशेष गौरव करण्यात आला. स्पेन येथे होणाऱ्या १६ वर्षांखालील तौसा चषक आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी त्याची निवड करण्यात आली आहे. किशोर गावडे यांनी स्पर्धेचे चार दिवस सूत्रसंचालन केले. पुरस्कार विजेते खेळाडू- पुरुष गट- अष्टपैलूः रिषांक देवाडिगा, पकडः शैलेष सावंत(भारत पेट्रोलियम), चढाईः अजय ठाकूर (एअर इंडिया), महिला गट- अष्टपैलूः पूजा किनी, पकड-तृप्ती सोनावणे(दोघी महात्मा गांधी), चढाईः आरती नार्वेकर (वीरमाता जिजाऊ).



## नारंगाला दोन रौप्य

नवी दिल्ली, ता. २९ - भारताचा आंतरराष्ट्रीय नेमबाज गगन नारंगने नुकत्याच कुवेत येथे झालेल्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत दोन रौप्य पदके जिंकली. आगामी लंडन ऑलिम्पिकसाठी पात्र ठरलेल्या गगनने ५० मीटर रायफल थ्री पोझिशन आणि दहा मीटर एअर रायफल प्रकारात दोन रौप्य पदकांची कमाई केली. ५० मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये त्याने रौप्य पदकाची कमाई करताना १,१६५ गुणांची कमाई केली. इंगेरीच्या एस. पीटरने १,१७१ गुणांची कमाई करून सुवर्ण पदक पटकावले.

## वेंगसरकरचे नाबाद शतक

मुंबई, गुरुवार - यंग कॉम्रेड ढाल क्रिकेट स्पर्धेत राहुन वेंगसरकरने काढलेल्या दमदार नाबाद शकताच्या जोरावर पारसी जिमखान्याने उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. पारसी जिमखान्याने यंग फ्रेडस्चा पराभव करून आपला विजय पक्का केला. राहुलने ११० धावा केल्या. आणखी एका सामन्यात शिवाजीपार्क जिमखान्याने कांदीवली क्रिकेट क्लबचा पराभव केला.

## 'आम्ही आहोत बेकार, केव्हा मिळेल रोजगार' गुरव बांधवांना आवाहन!

देवपूजा हाच गुरव समाजबांधवांचा पिढी-जात व्यवसाय आहे. सेवाभाव हाच आपला धर्म, हेच आपले कर्म समजून याच कर्मातील कर्तृत्वाने मागासले पणावर मात करत नवतरुण पिढीने शैक्षणिक क्षेत्रात गरूडझेप घेतलेली आहे. याकडे डोळेझाक करता येणार नाही.

दैनंदिन जीवनाच्या महामार्गावरून चालताना आपल्या आयुष्याचा रथ स्वाभिमानाने फिरावा अशी प्रत्येक नव तरुणाची इच्छा असते. परंतु दैनंदिन जीवनामध्ये बेकारी हाच प्रश्न भेडसावत आहे. याचा विचार कोण करणार? आणि केव्हा?

सद्य:स्थितीत ग्रामीण विभागामध्ये सुशिक्षित बेरोजगार तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. तरीही उज्वल भविष्याची स्वप्ने उराशी बाळगून नोकरीच्या शोधाकरिता ग्रामीण विभागातून शहराकडे धाव घेत आहेत. परंतु सुरक्षित आणि आनंदी जीवन जगण्याच्या ओढीने शहराकडे येणाऱ्या मुलांना असुरक्षित वातावरणाला सामोरे जावे लागत आहे. वास्तविक शहरातील बेकारी, वाढणारी महागाई यामुळे सर्वसामान्य माणसांचे जीवन खिळखिळीत झालेले आहे. त्याचबरोबर देशाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड यामुळे परिस्थिती अधिकच बिकट होत चाललेली आहे. यास्तव समाज संस्थेतील मान्यवर नेते आहेत त्यांनी याबाबत योग्य विचार करणे ही काळाची गरज आहे. कारण जो जागला तो जगला.

प्रत्येक जिल्हा पातळीवर औद्योगिक वसाहत एम.आय.डी.सी. आहेत तेथे

**मनोगत**

मोठ्याप्रमाणात लघु उद्योग सुरू आहेत. त्या ठिकाणी आपल्या मुलांना रोजगार का उपलब्ध होऊ शकत नाही. वास्तविक मुलांमध्ये असलेल्या कला-कौशल्याला न्याय मिळाला तर ग्रामीण विभागातून शहराकडे धाव घेणाऱ्या मुलांचा लोंढा कमी होऊ शकेल आणि सुशिक्षित बेरोजगार मुलांना हक्काच्या रोजगाराला न्याय मिळेल.

संपूर्ण देशामध्ये कोठे ना कोठे आपल्या न्याय-हक्कासाठी रास्ता रोको, तोडफोड, जाळपोळ यांसारखी आंदोलने सुरू आहेत. कोणीही फडतूस माणसे परप्रांतातून महाराष्ट्रामध्ये येतात आणि आपल्या रोजी रोटीच्या न्याय, हक्कासाठी महाराष्ट्राच्या छाताडावर नाचत धिंगाणा घालत आहेत.

आज आमच्या मुलांच्या रोजगाराच्या न्याय-हक्कासाठी आम्ही काय केले आहे का? फक्त हाताची घडी तोंडावर बोट, विवाह मंडळे स्थापन करून मुला-मुलींची जुळवाजळव करणे आणि सत्तेसाठी, खुर्चीसाठी स्पर्धा हाच कार्यक्रम वर्षानुवर्षे चालू आहे. अशाने आपल्या समाजाचा विकास होईल का?

**'वक्त की आवाज है मिलके चलो'**

वास्तविक सध्य:स्थितीत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये देवस्थानातील हक्काबाबत गावपातळीवर कोणीही उठतो आणि आपल्या विरुद्ध धिंगाणा घालत आहेत. समाजबांधवांना अजमावण्याचा प्रयत्न आहे. यास्तव महाराष्ट्रातील तमाम गुरव ज्ञाती बांधवांनो एक व्हा, अन्यायाविरुद्ध आवाज उठवा. लढल्याशिवाय न्याय मिळणार नाही. जागे व्हा. वक्त की आवाज है मिलके चलो!

**डॉ.शं.भि.गुरव**
**ताडदेव, मुंबई**
**मो. नं. ९२२१४६७३६५**




# नवाकाळ

मुंबई, शुक्रवार, ३० मार्च, २०१२ पान - ८




## लक्ष्य! लक्ष्य! लक्ष्य!
## ज्येष्ठ नागरिकांच्या दु:खाची चित्तवेधक रहस्यकथा



| | | |
|---|---|---|
| अदिती सारंगधर | – | इन्स्पेक्टर सलोनी देशमुख |
| अशोक समर्थ | – | एसीपी अभय किर्तीकर |
| जगन्नाथ निमानगुणे | – | इन्स्पेक्टर वीरेंद्र |
| कमलेश सावंत | – | हेडकॉन्स्टेबल मारुती जगदाळे |

आजच्या जमान्यातील ज्येष्ठ नागरिकाची हृदयस्पर्शी कहाणी सांगणारी रहस्यकथा बुधवार २८ मार्च रोजी रात्री ९.३० ते १०.३० या वेळात स्टार प्रवाहवर सादर करण्यात आली.

अन्य रहस्यकथांपेक्षा ही वेगळीच रहस्यकथा होती. ज्याने गुन्हा केला त्या ज्येष्ठ नागरिकाला असिस्टंट पोलीस कमिशनर अभय कीर्तिकर यांची टीम शिताफीने पकडते. पण चोरीमागची मन सुन्न करणारी कहाणी ऐकल्यावर अदिती सारंगधर (सलोनी) त्या ज्येष्ठ नागरिकाला म्हणतात– 'तुमच्यावर केस केली जाणार नाही. कारण आम्हालाही भावना आहेत. तुमची करूण कहाणी ऐकल्यावर मनाला खेद वाटला. तुमच्यासारख्या नागरिकांमुळेच आमचे हृदय हेलावते. पोलीस हाही माणूस आहे. तुमच्यावर केस केली जाणार नाही. तुमच्या परदेशी गेलेल्या निर्दय मुलांना शोधले जाईल. तुमच्याशी संपर्क करून दिला जाईल.'

ज्याचे हात नेहमी शिवशिवत असतात त्या हेडकॉन्स्टेबल मारुती जगदाळेलाही गहिवरून येते. पोलीस स्टाफच्याच नव्हे तर इतरांच्या भूमिकाही नेहमीप्रमाणे सरस झाल्या. दिग्दर्शक व संवाद लेखकाचे खास अभिनंदन केले पाहिजे. ते चित्त खिळवून ठेवतात. लक्ष्य! लक्ष्य! हा कार्यक्रम स्टार प्रवाहवर सोमवार ते गुरुवार रात्री ९.३० वाजता होतो. हा कार्यक्रम रंजक व उद्‌बोधक होतो. दूरदर्शनचे कार्यक्रम उथळ व विदुषकी चालतात. पण हा अपवाद आहे. विदुषकीनंतर मर्दुमकी आल्यासारखे वाटते.

**– नीलकंठ खाडीलकर**
**अग्रलेखांचे बादशहा**

## ५६ वर्षानंतरही सांगली जिल्ह्याच्या माथ्यावरील दुष्काळाचा कलंक कायम

सांगली, ता. २९ – सांगली जिल्ह्याच्या सध्या जत कवठेमहांकाळ व आटपाडी तालुक्यांना दुष्काळाचे चटके बसू लागले आहेत. आटपाडी तालुक्यातील मालेवाडी, शेटफळे व लेंगरेवाडी येथे प्रशासनाने कागदावर १२ खेपा व प्रत्यक्षात चारच पाण्याचा खेपा लोकांना मिळत आहेत. त्यामुळे घरातील लहान मुले पालक वयस्कर म्हातारी माणसे बायका पाण्यासाठी वणवण करतांना दिसत आहेत. ५६ वर्षानंतरही सांगली जिल्ह्याला लागलेला दुष्काळाचा हा कलंक पुसण्यात जिल्ह्याचे राज्यकर्ते अपयशी ठरले आहेत. आजही जिल्ह्याला तीन कॅबिनेट मंत्री असतानाही जनता मात्र पाण्यासाठी वणवण फिरत आहे. याकडे कोण लक्ष देणार आहे का? असा प्रश्न दुष्काळी जनताच उपस्थित करीत आहे. म्हणून 'नवाकाळ' इथल्या लोकांना पाणी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यासाठी येत्या १ एप्रिल रोजी म ालेवाडी, शेटफळे, लेंगरेवाडी गावातील लोकांची ग्रामसभा बोलावली आहें.

## ११ संशयित दहशतवादी ताब्यात
### १३/७ च्या बॉम्बस्फोटात सहभागाची शक्यता

मुंबई, गुरुवार – दहशतवादी विरोधी पथकाने महाराष्ट्रातील विविध भागांत धाडसत्र सुरू केले असून बीड, परळी, औरंगाबाद, नंदुरबार, उस्मानाबाद भागांतून ११ संशयित दहशतवाद्यांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. मुंबईत १३ जुलै रोजी दादर, ऑपेरा हाऊस आणि झवेरी बाजार येथे झालेल्या तिहेरी बॉम्बस्फोट प्रकरणी या आरोपींचा सहभाग असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. १३/७ बॉम्बस्फोट आणि पुण्यातील जर्मन बेकरी बॉम्बस्फोटात ताब्यात घेतलेल्या ११ आरोपींचा सहभाग असल्याची शक्यता असून त्यांची कसून चौकशी सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. दोन दिवसांपूर्वी औरंगाबादमध्ये अहमदाबाद बॉम्बस्फोटातील दहशतवादी एटीएसबरोबर झालेल्या चकमकीत ठार झाला होता. तर दोघे दहशतवादी पोलिसांच्या हाती लागले. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीआधारे हे छापे मारले.

## नवाकाळ ९० वा वर्धापनदिन योजना

प्रश्न क्र. १०) खालीलपैकी कोणती रचना शेक्सपिअरची नाही?

पर्याय अ) **हेमलेट**

पर्याय ब) **किंग लीथर**

पर्याय क) **पॅराडाइज लॉस्ट**

नवाकाळ
९० वा वर्धापनदिन योजना
अचूक उत्तर पर्याय क्रमांक
प्रश्न क्र. १०

# नक्षलवाद्यांच्या मुद्यांवर गृहमंत्री आर.आर. पाटलांचा सरकारला घरचा आहेर

## सरकारच्या सिस्टीममध्ये दोष! केंद्रीय गृहखाते आणि मानवी हक्क आयोगावर केली कडक टीका

मुंबई, गुरुवार – गडचिरोलीत नक्षलवाद्यांच्या भूसुरुंगाच्या स्फोटात १२ सीआरपीचे जवान शहीद झाले. या प्रश्नावरून उपस्थित झालेल्या चर्चेला उत्तर देताना गृहमंत्री आर.आर. पाटील यांनी सरकारमधील दोष मानवी हक्क आयोगाची भूमिका आणि केंद्रीय गृहखात्याच्या भूमिकेवर कडाडून हल्ला चढविला. ही घटना गंभीर असली तरी यामागे आपल्या सिस्टीमचा दोष आहे, असे विधान करीत आम्ही घटनेची माहिती दिली होती हे दिल्लीतलं तुणतुणं आता बंद झालं पाहिजे, असे आव्हानच गृहमंत्र्यांनी केंद्रीय गृहखात्याला दिल्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधले शाब्दिक युद्ध पुन्हा चव्हाट्यावर आले आहे.

धानोरा तालुक्यात भूसुरुंगाच्या स्फोटात १२ सीआरपीचे जवान ठार झाले. या गंभीर घटनेवर आज विधानसभेत विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे व अन्य सदस्यांनी नियम १०१ अन्वये चर्चा उपस्थित केली होती. गडचिरोलीमध्ये नक्षलवाद्यांचा प्रभाव वाढू लागला आहे आणि जनता पोलिसांवर विश्वास ठेवत नाही. पूर्ण क्षेत्राला नक्षलवाद्यांनी वेढा घातला आहे. हे नक्षलवादी आता धंदेवाईक झाले असून त्यांना तेंडुपत्ते आणि बांबूंचे व्यापारी मदत करतात. या भागात विकास झालेला नाही. अशा घटना घडल्या की फक्त चर्चा होते. आणि पुन्हा तशीच परिस्थिती निर्माण होते. सीआरपीएफ जवान आणि स्थानिक पोलीस यांचा समन्वय नसल्याचे मुद्दे विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी व्यक्त केले. तर एकदा रेल्वे अपघात घडल्यानंतर लालबहाद्दूर शास्त्री यांनी त्वरित राजीनामा दिला होता. मात्र, गडचिरोलीत दहशतवाद्यांकडून वारंवार अशाप्रकारच्या घटना घडल्या तरी संवेदनशील मनाचे असलेले आर.आर. पाटील राजीनामा का देत नाहीत? असा सवाल आमदार नाना पाटोले यांनी केला.

सभागृहात २ तास झालेल्या चर्चेला गृहमंत्री आर.आर. पाटील यांनी एक तासाच्या भाषणात सर्व मुद्यांची उत्तरे दिली. आर. आर. पाटील म्हणाले, 'गेल्या अडीच वर्षात घडलेली ही सर्वात मोठी दुर्घटना आहे. आतापर्यंत नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात ५४ पोलीस, १५७ सीआरपीएफचे जवान, ४५७ नागरिक आणि ११७ नक्षलवाद्यांचा मृत्यू झालेला आहे. गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्रात नक्षली कारवाईच्या ५१९ घटना घडल्या असून त्यात २३९ नागरिकांचा मृत्यू झाला आहे.'

या घटनेबाबत माझी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा झालेली आहे. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात 'अ' आणि 'ब' वर्गातील ३५ टक्के पदे रिक्त आहेत. मग जागेवर योजना जाणार कशा? असा सवाल करत गडचिरोली जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्राची वाणवा आहे. वाहतुकीची व्यवस्था नाही. खड्ड्यातून प्रवास करावा लागतो. गावापासून ४२ किलोमीटरवर रेशनिंग दुकान आहे. अशी वस्तुस्थिती मांडत या सर्व गोष्टी नक्षलाला कारणीभूत असल्याचा घरचा आहेर देत आपल्या व्यवस्थेतच मोठे दोष आहेत, असे आबा म्हणाले. तसेच या नक्षली कारवाईत अनेक धंदेवाईक लोक घुसले असून हे नक्षलीनेते शहरात राहतात आणि त्यांची मुले परदेशात शिकतात, अशा सर्व नेत्यांवर आमची नजर असून योग्यवेळी पुराव्यानिशी त्यांना उघडे पाडले जाईल, असे आर.आर. पाटील म्हणाले.

राज्यांत अशी घटना घडली तर आम्ही दीड वर्षांपूर्वीच राज्याला माहिती दिली होती, असे केंद्रीय गृहखाते सांगून राज्याच्या गृहमंत्र्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करतात आणि घटना घडल्यावर गप्प बसतात. हे उद्योग आता बंद करा आणि राज्याचे सर्व अधिकार घेऊन नक्षलींना रोखण्यासाठी एकच कायदा करा. तोपर्यंत दिल्लीतलं हे तुणतुणं बंद झाले पाहिजे. असा टोलाही आर.आर. पाटील यांनी केंद्रीय गृहखात्याला दिला. सध्या खनिज उत्खनन क्षेत्रात नक्षलींची भरती चालू झाली आहे. त्यांना पैसा कोण पुरवतं याची माहिती आपल्याकडे असल्याची आबांनी स्पष्टपणे सांगितले.

नक्षलीबरोबर राज्यात दहशतवादी कारवाई झाल्या. परवा औरंगाबादमध्ये अतिरेक्यांच्या गोळीत एक हवालदार जखमी झाला तर पोलिसांच्या प्रत्युत्तरात एक अतिरेकी ठार झाला. मात्र जखमी झालेल्या पोलिसांच्या चौकशीसाठी पोलीस पुढे येत नाही पण औरंगाबादमध्ये अतिरेकी ठार झाला ही बाब आज ना उद्या निश्चितच मानवी हक्क आयोगाने पुढे येईल आणि ३ लाखांची मदत द्या, हे डोळेझाकपणे सांगतील, असे वक्तव्य करून आर.आर. पाटील यांनी मानवी हक्क आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले.

## दोन दहशतवादी पोलीस कोठडीतून पळाले

श्रीनगर, ता. २९– 'हुजी' श्रीनगरच्या भागात सनसनाटी घटना घडली आहे. 'हुजी'चे दोन दहशतवादी पोलिसांच्या कोठडीतून फरार झाले आहेत. त्यात एका हुजीच्या कमांडरचा समावेश आहे.शेरखान व त्याचा सहकरी जमील ऊर्फ अब्दुल्ला अशी या दोघांची नावे आहेत. चार पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे.

## गडचिंचलेत आदिवासी डबक्यातले पाणी पितात

डहाणू, ता. २९– गुजरात सीमेजवळच्या गडचिंचले गावातील आदिवासी बांधवांना तीव्र पाणीटंचाई भासू लागली आहे. थेंब– थेंब पाण्यासाठी इथले आदिवासी दिसेल त्या डबक्यातील पाणी गोळा करीत आहेत. जंगली जनावरांसारखी या आदिवासी बांधवांना पाण्यासाठी रात्र–दिवस भटकंती करावी लागत आहे.

## लातूरात सोयाबीनला मिळतोय विक्रमी भाव

लातूर, ता. २९– नगदी पीक म्हणून सोयाबीनकडे वळलेल्या लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सध्या खुषीचे दिवस दिसत आहेत. यंदा सोयाबीन पिकाला गेल्या पाच वर्षांतील विक्रमी भाव मिळत आहे.

## मंत्रालयात आमदारांच्या खोट्या सह्यांची बनवाबनवी! सीआयडी चौकशी होणार

मुंबई, गुरुवार– महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ई–१ शाखेतून विधानपरिषदेत दोन अर्ध्या–अर्ध्या तास चर्चा घडवून आणण्यासाठी आमदारांच्या खोट्या सह्या करण्यात आल्याचा गंभीर प्रकार आज विधानपरिषदेत चर्चेला आला. आमदारांच्या खोट्या सहीचे प्रकरण अतिशय गंभीर आहे. यामागे प्रशासनातील अधिकारी व आमदारच आहेत का? याची सीआयडी चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा विधान परिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख यांनी केली आहे.

शिवसेनेच्या आ.नीलम गोऱ्हे यांच्या नावे दोन विषयावर चर्चा घडवण्यासाठी विधान मंडळामध्ये चार आमदारांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आ.गोऱ्हे यांना ही तुम्हीच सूचना केली का? असे सूचित करताच हा गंभीर प्रकार उघडकीस आला होता. मागील हिवाळी अधिवेशनामध्येही अशाच प्रकारच्या २५ लक्षवेधी आमदारांच्या खोट्या सह्या वापरून केल्या होत्या. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर या ऐनवेळी रद्द करण्यात आल्या होता.

त्यानंतर या अधिवेशनामध्ये आमदारांच्या खोट्या सह्यांचा पर्दाफाश झाला. असे प्रकार यापुढे होऊ नयेत. त्यासाठी या प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी सदस्यांनी करताच सभापतींनी त्यावर शिक्कामोर्तब केले. तसेच विधान परिषदेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतले जातात? अशा चर्चा असून त्यावरही योग्य ते प्रतिबंध करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

## सोनसाखळी चोरास २ वर्षांची शिक्षा

औरंगाबाद, ता. २९– सोनसाखळी चोरी प्रकरणी शेख रईस ऊर्फ बोक्या याला मुख्य न्यायदंडाधिकारी एस. व्ही. मारलगड्ड यांनी दोषी ठरविले. त्याला दोन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.





**संगिता प्रेमानंद घोगळे**
जन्म:३०/०३/२००३
शुभेच्छुक: यश, शमिका, मृणाल, मम्मी, पप्पा, सुरेंद्र, जयेश, अल्पना, ताई, मनोज, आजी–आजोबा.
पत्ता:३/४३ वाकाणी हाऊस गोखले सोसायटी लेन परेल मुंबई नं.४०००१२
मो.नं.९८७०९६०५०१/९९६७५४७७३२


## क्षयरोगाकडे दुर्लक्ष करू नका

सिंधुदुर्ग, ता. २९– क्षयरोग हा एड्सपेक्षा महाभयानक रोग आहे. त्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष करू नका. शासनाने तीन लाखांपेक्षा जास्त रकमेची औषधे व तपासणीसाठी येणारा खर्च केवळ रुग्णांसाठी उपलब्ध करून दिला आहे, अशी माहिती सावंतवाडी कुटीर रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर दुर्माटकर यांनी दिली. जागतिक क्षयरोगाचे औचित्य साधून येथील कुटीर रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. त्यावेळी व्यासपीठावर डॉ. भगवान पितळे, डॉ. प्रितम जगताप व डॉ. सागर जाधव आदी उपस्थित होते.




